# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील कामगार रुग्णालयात रूग्णांची होणारी गैरसोय**

**(१) ५६० (२०-०३-२०२०). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एकूण १२ कामगार रुग्णालयांपैकी बहुतेक रुग्णालयांच्या इमारती धोकादायक झाल्या असुन डॉक्टर आणि कर्मचा-यांअभावी या रुग्णालयांमध्ये उपचारासाठी येणा-या रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य कामगार विमा योजना रुग्णालयांसाठी १०० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, राज्यातील कामगार रुग्णालयांसाठी असलेला निधीचा पुरेपुर उपयोग करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच या रुग्णालयाला पायाभूत सुविधा, अद्यावत उपकरणे व आवश्यक डॉक्टर व कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२७-०१-२०२१)** :(१), (२) व (३) हे अंशतः खरे आहे.
राज्यात महाराष्ट्र शासनाच्या मालकीचे तीन राज्य कामगार विमा योजना रुग्णालये असून राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांच्या मालकीचे आठ राज्य कामगार विमा योजना रुग्णालये आहेत. शासनाच्या मालकीच्या वरळी रुग्णालयाचे पुनर्निर्माण व मुलुंडच्या विशेष दुरुस्तीकरीता राज्य कामगार विमा सोसायटीचा निधी वापरण्यास परवानगी देण्याबाबत राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांना विनंती करण्यात आली आहे.

राज्य कामगार विमा महामंडळाच्या ठाणे व उल्हासनगर येथील रुग्णालयांच्या दुरुस्तीकरीता केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे.
महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटीला १०१ कोटी रुपयाचा निधी माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये प्राप्त झाला आहे.

(४) महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटीमार्फत औषधी, वैद्यकीय खर्च प्रतिपुर्ती प्रकरणे, वैद्यकीय उपकरणे व यंत्रसामुग्री, रुग्णालयीन इमारतींच्या वार्षिक देखभाल व इतर मनुष्यबळ उपलब्ध करणे इ.बाबींकरीता रु.८६ कोटी खर्च केला आहे.

(५) राज्य कामगार विमा योजना रुग्णालयांच्या इमारतींची दुरुस्ती तसेच डॉक्टर व कर्मचारी वर्ग कंत्राटी पध्दतीने उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## निरा उजवा कालवा विभाग, फलटण (जि. सातारा) या विभागातील उपअभियंता यांनी केलेला गैरव्यवहार

**(२) ७६७ (१०-०४-२०२०). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निरा उजवा कालवा विभाग फलटण, (जि. सातारा) या विभागातील उपअभियंता श्री. माणिक देशमुख यांनी सांगोला तालुक्यातील शेतक-यांना वेठीस धरणे तेथील शेतक-यांना पाणी पुरवठा करताना आर्थिक गैरव्यवहार करुन ठराविक शेतक-यांनाच पाणी देणे अशा प्रकारामुळे तेथील नागरीकांनी व शेतक-यांनी माहे जुलै, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान सांगोला येथील महुद रोड वरील चिंचोली तलावाजवळ आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त कालव्यावर बेकायदेशीरपणे मोठ्या प्रमाणात पाणी उपसा होत असून अनधिकृत पाणी उपसा करणाऱ्यांमार्फत अस्तरीकरण दरम्यान कालव्यात पाईप टाकत असल्याने रितसर पाणी अर्ज देणाऱ्या शेतकऱ्यांना त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तेथील शेतक-यांनी पाण्याचे पास काढून देखील त्यांना पाणी न देणे, एजंट नियुक्त करून आर्थिक गैरव्यवहार करणे तसेच या पूर्वी संबधितावर गैरव्यवहाराचा ठपका असल्याने मोठ्या प्रमाणात शासनाकडे चौकशी सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने संबंधित अधिका-यांवर कारवाई करण्यासह रितसर शेतकऱ्यांना पाणी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. जयंत पाटील (२७-०१-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.
निरा उजवा कालवा शाखा क्र.४ व ५ मधून पाणी सोडून चिंचोली तलाव व चिंचोली ओढ्यावरील सर्व बंधारे भरुन मिळावे या मागणीसाठी दि. ९/८/२०१९ रोजी महूद रोड चिंचोली तलावाजवळ ग्रामस्थ रास्ता रोको करणार असल्याचे पोलीस निरीक्षक, सांगोला पोलीस स्टेशन, सांगोला यांना दि. ८/८/२०१९ च्या पत्रान्वये कळविले होते. तथापि, सदर दिवशी रास्ता रोको आंदोलन झालेले नाही. तदनंतर सदर मागणीसाठी ग्रामपंचायत बामणी येथील ५८ शेतक-यांनी दि. १९/८/२०१९ रोजी बामणी-पंढरपूर हायवेवर रास्ता रोको आंदोलन केले होते.

(२) निरा उजवा कालवा कि.मी. क्र. १५० ते १६९ मधील भागामध्ये ज्या ठिकाणी अस्तरीकरण झालेले आहे त्या ठिकाणी काही अंशी अनधिकृत सायफन टाकून पाणी उपसा होत असल्याचे त्यावेळी निदर्शनास आल्याने असे अनधिकृत सायफन्स तातडीने गस्ती पथकामार्फत काढून टाकण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(३) व (४) श्री. माणिक रामचंद्र देशमुख, तत्का. उपविभागीय अभियंता, पंढरपूर उपविभाग, नीरा उजवा कालवा विभाग, फलटन येथे कार्यरत असताना केलेल्या अनियमिततेबाबत श्री. देशमुख यांच्याविरुध्द मनासे (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या नियम १० खाली दि. ३/३/२०२० च्या ज्ञापनान्वये दोषारोप बजावून शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोणवाडी (ता. नांदुरा जि. बुलढाणा) येथील लघु प्रकल्पाच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(३) २२८४ (२४-०७-२०२०). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणवाडी (ता. नांदुरा, जि बुलढाणा) येथील पाटबंधारे विभागाच्या मलकापूर विभागाअंतर्गत लघु प्रकल्प कामामध्ये गैरव्यवहार झाल्याने प्रकल्प नादुरुस्त होऊन स्थानिक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उपरोक्त कामाच्या गैरव्यवहाराबाबत स्थानिक शेतकऱ्यांनी तहसीलदार नांदुरा, जिल्हा बुलढाणा यांच्याकडे दिनांक २० एप्रिल, २०१७ रोजी व त्या सुमारास सादर केलेली तक्रार शासनास प्राप्त झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय निष्पन्न झाले

(४) असल्यास, त्यानुसार लोणवाडी, ता. नांदुरा, जि बुलढाणा येथील लघु प्रकल्पाच्या कामात आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (२५-०१-२०२१)** :(१) हे खरे नाही, तथापि, प्रकल्पाची घळभरणी झाल्यापासून प्रकल्पात पुरेसा पाणीसाठा झाला नसल्याने कालव्याव्दारे सिंचन होऊ शकले नाही.

(२) होय, हे खरे आहे. स्थानिक शेतकरी श्री. संतोष शं. डिवरे, यांची दिनांक १७/०४/२०१७ ची तक्रार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून बुलढाणा पाटबंधारे विभाग, बुलढाणा यांचेकडे प्राप्त झाली आहे.

(३) महामंडळाने या कामांबाबत चौकशी अधिकाऱ्याची नेमणूक करुन सदरहू तक्रारीच्या अनुषंगाने कामाची चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने कामाची चौकशी करण्यात आली आहे. निकृष्ठ काम Tender Clause नुसार पुन्हा दुरुस्त करुन देण्याबाबत संबंधीत कंत्राटदारास पत्राने कळविण्यात आले आहे.

सांडव्याच्या उजव्या भागातील पक्ष भिंतीची कंत्राटदाराने दुरुस्ती करुन दिली आहे. तसेच कालव्यावरील तीन बांधकामे निकृष्ठ असल्याचे आढळून आले आहे. परंतु निकृष्ठ असलेल्या बांधकामाचे कंत्राटदारास भुगतान करण्यात आलेले नाही.

(४) लोणवडी प्रकल्पाचे मुख्य धरणाचे कामासाठीचे निविदा अंतर्गत कलम-२ अन्वये मंडळ कार्यालयाचे दिनांक १५/१/२०१३ च्या पत्रान्वये दिनांक २१/१२/२०१२ पासून कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही सुरु केली आहे. तसेच दि. ०१/०७/२०१२ नंतर कंत्राटदारास कुठल्याही कामाचे भुगतान करण्यात आले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**नांदुरा (जि. बुलढाणा) तालुक्या अंतर्गत जिगाव प्रकल्पाच्या कामासाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत**

**(४) ३०४० (१६-०४-२०२०). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदुरा (जि. बुलढाणा) तालुका अंतर्गत सुरू असलेल्या जिगाव प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीच्या निवाड्याची मुदत संपत आली असून सदर निवाडे व्यपगत होण्याची वेळ आली असल्याची बाब दिनांक २० जानेवारी,२०२० रोजी व त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे निवडे व्यपगत झाल्यास कालमर्यादा असलेल्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे काम पूर्ण होण्यास बराच कालावधी लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिगाव प्रकल्पासाठी भूसंपादन करण्यात आलेल्या जमिनीचे निवडे व्यपगत होऊ नये तसेच सदर महत्त्वाकांक्षी प्रकल्प कालमर्यादेत पूर्ण व्हावा यासाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २१ जानेवारी २०२० रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री तसेच दिनांक १३ जानेवारी २०२० रोजी वा त्या सुमारास मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानुसार जिगाव प्रकल्पाचे झालेले निवाडे व्यपगत होऊ नये तथा नव्याने करावयाची निवाडा प्रक्रिया तातडीने करणेबाबत सदर प्रकल्पासाठी रु.१००० कोटीचा निधी तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. जयंत पाटील (२८-०१-२०२१) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

भुसंपादन प्रकरणे व्यपगत झाल्यास प्रकल्पाचे नियोजनाच्या कालावधी मध्ये वाढ होऊ शकते.

(३) प्रकल्पात प्रलंबित भूसंपादन व कामांसाठी मा.श्री.राजेश पंडीतराव एकडे, वि.स.स. (मलकापूर) यांचे दि.२०/१२/२०१९ रोजीचे निवेदन, श्री.ॲड. आकाश पांडुरंग फुंडकर, वि.स.स. (खामगांव) यांचे दि.२०/१२/२०१९ रोजीची मा.मुख्यमंत्री महोदयांना सादर केलेली निवेदने प्राप्त झाली आहेत.

(४) भूसंपादन प्रकरणे व्यपगत होऊ न देता व्यपगत होणाऱ्या प्रकरणास नियमाप्रमाणे जिल्हाधिकारी बुलढाणा यांच्यामार्फत एक वर्षाची मुदतवाढ घेण्याची कार्यवाही करण्यांत आलेली आहे. त्याचप्रमाणे रुपये २४४.८६ कोटी इतका निधी हा व्यपगत होणाऱ्या भूसंपादन प्रकरणासाठी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेकडे जमा करण्यांत आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वंडली पिंपळगांव (ता.कळंब, जि. यवतमाळ) येथील शिवारातील शेतीचे नुकसान झाल्याबाबत**

**(५) ३७७० (२४-०४-२०२०). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वंडली पिंपळगांव (ता. कळंब, जि. यवतमाळ) शिवारातील बेबंळा कालव्याच्या निकृष्ट दर्जाचे मायनर नालीचे बांधकाम केले असल्याने सदर मायनर फुटुन शेतकरी श्री. अरविंद माढरे यांचे शेत गट नं २१३ चे शेतात पाणी जाउन पिकांचे नुकसान झाले असल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेबंळा कालवे विभागामार्फत सबंधित शेतक-यांच्या शेती नुकसानी बाबत तपासणी करण्यात आली असल्याचे व कत्रांटदाराने मायनरचे काम व्यवस्थीत केले नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू शेतक-यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. जयंत पाटील (२८-०१-२०२१) :**(१) हे खरे नाही.

विषयामधील नमुद क्षेत्र (गट नं. २/(३) हे बेंबळा मुख्य कालवा / वंडली लघुपाट / सरळ विमोचक डावा ५ च्या पाटचारी लगतचे क्षेत्र आहे. सदर मायनर फुटलेला नाही, संबंधीत शेतकरी यांचे शेतात आलेला पाझर लघु कालव्यातून काढलेल्या पुर्ण भरावातील पाटचारीतून आलेला आहे.

(२) अंशतः खरे आहे.

सदर लघु पाटावरील सरळ विमोचक डावा पाच वरील पाटचारीच्या अस्तरीकरणातील पाझरामुळे होणाऱ्या नुकसानीची तपासणी करण्यात आली आहे.

(३) याबाबत कृषि विभागासमवेत संयुक्त पाहणी करून नुकसान भरपाईबाबत कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जोडमोहा (ता. कळंब, जि. यवतमाळ) येथे प्राथमिक आरोग्य केंद्र नसल्याबाबत**

**(६) ४२२७ (१३-०४-२०२०). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोडमोहा (ता. कळंब, जि. यवतमाळ) हे चार ते पाच हजार लोकसंख्या वस्ती असलेले गाव राज्यमहामार्गावर असल्याने तेथे नेहमी रस्ते अपघात होत असुन सदरहू ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र नसल्याने रूग्णाला २५ कि.मी. अंतरावर यवतमाळ येथे तपासणी करिता जावे लागत असल्याने, रुग्णावर वेळेत उपचार न झाल्यास रूग्ण दगावत असल्याचे दिनांक २१ जानेवारी २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र उभारणीबाबत स्थानिकांनी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास जोडमोहा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२-०२-२०२१) :**(१) हे अंशत: खरे आहे.

जोडमोहा येथून १५ कि.मी अंतरावर प्राथमिक आरोग्य केंद्र मेटीखेडा कार्यरत आहे.तेथे रुग्णांवर औषधोपचार उपलब्ध आहेत.

(२) जोडमोहा येथे आरोग्य केंद्र सुरू करण्यासाठी दि.१३.०७.२०१७ रोजी पंचायत समिती, जोडमोहा च्या मासिक सभेत मंजूरी घेण्यात आलेली आहे.

(३) मेटीखेडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी ग्रामीण रुग्णालय मंजूर झाले आहे.त्याचे बांधकाम होऊन ग्रामीण रुग्णालय कार्यरत झाल्यावर तेथील प्राथमिक आरोग्य केंद्र जोडमोहा येथे स्थलांतरीत करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## कोल्हापुर जिल्हयातील महापुरामधील वाहून जाणारे पुराचे पाणी दुष्काळग्रस्त भागाकडे वळविण्याबाबत

**(७) ४३०४ (१६-०४-२०२०). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात आलेल्या महापूरामध्ये वाहून जाणारे पुराचे ११५ टीएमसी पाणी दुष्काळग्रस्त भागाकडे वळविण्याबाबतची व २०१ किमी लांबीच्या २२ हजार कोटी रुपयांच्या कृष्णा-भिमा स्थिरीकरण जननियोजन प्रकल्पाचे जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी जागतीक बँकेच्या पथकासमारे सादरीकरण केले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. जयंत पाटील (२९-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे.

जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी जागतिक बँकेच्या पथकासमोर उपरोक्त विषयाबाबत सादरीकर केले.

(२) कृष्णा पाणी तंटा लवाद २ च्या निर्णयामध्ये लवादाने घातलेल्या अटीनुसार कृष्णा खो-यातील पाणी एका उपखो-यातून दुस-या उपखो-यात वळविण्यास मनाई केलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उस्मानाबाद येथील महिला रुग्णालयांमधील खाटांची संख्या वाढविण्याबाबत**

**(८) ५५०६ (२२-०३-२०२०). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयात महिलांचे ६० खाटांचे रुग्णालय आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू महिला जिल्हा रुग्णालयामध्ये दररोज येणा-या महिलांची संख्या सुमारे २५० ते ३०० च्या वर आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू महिला रुग्णालयातील अपु-या खाटांच्या संख्येमुळे अनेक प्रसुती झालेल्या महिलांना खाट उपलब्ध नसल्याने जमिनी वर झोपावे लागते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू महिला रुग्णालयांच्या खाटांची संख्या वाढविण्याबाबत लोकप्रतिनिधींनी वारंवार लेखी पत्राद्वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उस्मानाबाद जिल्हयातील महिला रुग्णालयाच्या खाटांच्या संख्येमध्ये वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

**श्री. राजेश टोपे (२५-०१-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

अनेक प्रसुती झालेल्या महिलांना जमिनीवर झोपावे लागते हे खरे नाही. मात्र काही वेळेस अधिक रुग्ण भरती झाल्यास जमिनीवर गादी टाकुन व्यवस्था करण्यात येते.

(४) हे खरे आहे.

(५) उस्मानाबाद येथील ६० खाटांच्या स्त्री रुग्णालयाचे, १०० खाटांच्या स्त्री रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबतची मागणी निकषानुसार जोडबृहत आराखडयामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**राज्यातील अनेक रुग्णवाहिका चालकांचे इन्शुरन्स नसल्याबाबत**

**(९) ५७२७ (२५-०३-२०२०). श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १०२ रुग्णवाहिका सेवा चालविण्याचे कंत्राट मे.अशकोम (Ashkom) इंडिया प्रा.लि. मिडिया भोपाळ या कंपनीला देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियमांप्रमाणे सुरुवातीचे ६ महिने चालकांचा इन्शुरन्स कंपनी ने काढणे आवश्यक असताना तो काढण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२५-०१-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मे. अशकोम मेडिया इंडिया प्रा.ली. भोपाळ या कंपनीने राज्यात वाहनसेवा पुरवठा सप्टेंबर, २०१८ मध्ये सुरु केला होता. त्यानुसार कंपनीने नियमानुसार सप्टेंबर, २०१८ पासून नियुक्त

केलेल्या वाहनचालकांचा इन्शुरन्स काढण्यात आला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाचोरा-भडगांव (जि. जळगांव) तालुक्यातील उतावळी-बहुळाचे भूसंपादन नविन भूसंपादन कायदयाने करावे व जोड कालव्याचे काम प्रचलित पध्दतीने करणेबाबत**

**(१०) ५७६४ (१६-०४-२०२०). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाचोरा-भडगांव (जि. जळगांव) तालुक्यातील उतावळी-बहुळाचे भूसंपादन नविन भूसंपादन कायदयाने करावे व जोड कालव्याचे काम प्रचलित पध्दतीने करावे, असे निर्देश तत्कालिन जलसंपदा मंत्री, यांनी दिनांक ३ जून, २०१९ रोजी वा त्यासुमारास दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०२-०२-२०२१) :** (१) होय.
(२) व (३) उतावळी बहुळा या जोड कालव्यासाठी आवश्यक असणाऱ्या ३३०० मी. लांबी पैकी साजगांव शिवारातील १२०० मी. लांबी मधील भूसंपादन वगळता साजगांव व बिल्दी शिवारासाठी ७.३६ हेक्टर. आर. क्षेत्रासाठी उपअधीक्षक भूमी अभिलेख, पाचोरा यांनी रु. १.०५ लक्ष मात्र ची मोजणी फी मागणी क्षेत्रीय विभागाकडे केलेली आहे. त्यानुषंगाने मोजणी फी भरणा करणेबाबत उचित कार्यवाही क्षेत्रीय विभागामार्फत करण्यात येत आहे.

---

**भोर (जि.पुणे) तालुक्यातील निरा-देवधर प्रकल्पाचा डावा कालवा व त्यावरील वितरण व्यवस्थेचे कामाकरिता निधी उपलब्ध करणेबाबत**

**(११) ५९९९ (१०-०४-२०२०). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोर (जि.पुणे) तालुक्यातील निरा-देवधर प्रकल्पाचा डावा कालवा व त्यावरील वितरण व्यवस्थेचे काम बंद नलिकेद्वारे सुधारित सर्वेक्षण करणेबाबत व त्यासाठी रुपये ६० कोटींचा निधी मंजूर करुन उपलब्ध होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री, यांना दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास पत्र सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पत्रावर शासनाने निर्णय घेऊन व निधीची तरतूद करुन सदरील कामासाठी ६० कोटी रुपये निधी मंजूर करुन उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. जयंत पाटील (१४-०१-२०२१) :** (१)हे खरे नाही.
स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी सादर केलेले निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
तथापि, मा.मंत्री (जलसंपदा) यांच्या अध्यक्षतेखाली सदर विषयासह इतर प्रकल्पांच्या विविध प्रलंबित कामासंदर्भात दिनांक २८ जानेवारी, २०२० रोजी मंत्रालय, मुंबई येथे बैठक संपन्न झाली. त्याअनुषंगाने निरा देवघर प्रकल्पास सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरीता रु.५०.०० कोटी एवढी अर्थसंकल्पिय तरतूद मंजूर करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पालघर जिल्हयातील सिव्हील रुग्णालयातून अपंग प्रमाणपत्र वेळेत मिळत नसल्याबाबत**

**(१२) ६१९८ (२५-०३-२०२०). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हयात सिव्हील रुग्णालयातून अपंग प्रमाणपत्र वेळेत मिळत नसल्यामुळे त्यांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, जिल्हयातील हे एकमेव केंद्र केवळ एकदा म्हणजे बुधवारी सुरू असते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हयातील मोखाडा, जव्हार, विक्रमगड हे भाग दुर्गम असून पालघर शहरापासून दूर अंतरावर असल्याने प्रवासाच्या दृष्टिकोनातून सदर केंद्र अपंगांना गैरसोयीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुषंगाने पालघर जिल्हयातील अपंग नागरिकांना तात्काळ अपंगप्रमाणपत्र मिळणे तसेच जिल्हयाच्या तालुकास्तरावर असलेल्या शासकीय रुग्णालयांमध्ये शिबिरे आयोजित करून अपंगांच्या दाखल्यांचे वितरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२१-०२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

जिल्हा रुग्णालय, पालघर येथे दर बुधवारी सर्व दिव्यांग प्रमाणपत्रे व ग्रामीण रुग्णालय विरार येथे महिन्याच्या दर गुरूवारी अस्थिव्यंग दिव्यांग प्रमाणपत्र; उपजिल्हा रुग्णालय, जव्हार व ग्रामीण रुग्णालय, मोखाडा येथे दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या बुधवारी अस्थिव्यंग प्रमाणपत्र; उपजिल्हा रुग्णालय, डहाणू येथे महिन्याच्या दुसऱ्या बुधवारी मुकबधीर दिव्यांग प्रमाणपत्र देण्यात येतात.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर येथील राज्य कामगार विमा रुग्णालयातील विविध समस्यांबाबत**

**(१३) ६८४६ (१३-०४-२०२०). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथील राज्य कामगार विमा रूग्णालय (इ.एस.आय.हॉस्पिटल) येथील विविध समस्या सोडविण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी राज्य वैद्यकीय आयुक्त यांना माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान लेखी पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पत्राची दखल घेऊन त्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२७-०१-२०२१) :**(१) हे खरे आहे.

(२) राज्य कामगार विमा योजनेतंर्गत पुरविण्यात येणाऱ्या सेवा हया अधिक सुलभतेने व परिणामकारकरित्या पुरविण्यात याव्यात. याकरीता शासनाने राज्य कामगार विमा योजनेकरीता महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी स्थापित केली आहे. सदर सोसायटीमार्फत कंत्राटी पध्दतीने अंशकालीन विशेषज्ञांची नियुक्ती, वैद्यकीय उपकरणे व नवीन रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. राज्य कामगार विमा महामंडळामार्फत खाजगी रुग्णालयांशी टाय-अप करण्यात आले असून राज्य कामगार विमा रुग्णालयाचे फायर ऑडीट करुन घेण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केंद्राच्या अधिपत्याखालील राज्य कामगार विमा योजना (ईएसआय) प्रभावी करण्यासाठी राज्य कामगार विमा सोसायटी स्थापन करण्यास शासनाने दिलेली मंजूरी**

**(१४) ६८८५ (१३-०४-२०२०). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्राच्या अधिपत्याखालील राज्य कामगार विमा योजना (ईएसआय) प्रभावी करण्यासाठी राज्य कामगार विमा सोसायटी स्थापन करण्यास शासनाने मंजूरी दिली असल्याचे माहे डिसेबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर शहर आणि जिल्हयात ई.एस.आय सदस्यांची संख्या गेल्या ५ वर्षात ३ हजारांनी वाढली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संख्येच्या प्रमाणात सोलापूर येथील होटगी रस्त्यांवरील रुग्णालयात आवश्यक सुविधा नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२७-०१-२०२१)** :(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.
राज्य कामगार विमा योजना रुग्णालय सोलापूर करीता कंत्राटी पध्दतीने अंशकालीन विशेषज्ञांची नियुक्ती, वैद्यकीय उपकरणे व नवीन रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पहूर (ता. बाभुळगांव, जि. यवतमाळ) येथील पुनर्वसीत गावामध्ये १८ नागरी सुविधाचे काम अपूर्ण अवस्थेत असल्याबाबत

**(१५) ७३८९ (१६-०४-२०२०). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पहूर (ता. बाभुळगांव, जि. यवतमाळ) येथील बेंबळा प्रकल्पामध्ये पुनर्वसीत गाव असुन पुनर्वसनामध्ये १८ नागरी सुविधा पुरविण्याबाबत शासन निर्णय असतांना गावामध्ये पुनवर्सनाचे अपूर्ण कामे असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुनर्वसीत गावाचे ११ वर्षाआधी पुनर्वसन झाले परंतु गावामध्ये रस्ते नालीचे बांधकाम, स्वच्छता गृह असे अनेक नागरी सुविधेचे अंतर्गत करावयाचे कामे अपुर्ण असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास पुनर्वसीत गावातील प्रलंबित विकास कामानां शासनाकडून विषेश निधी देण्यात आला असुन अद्यापपर्यंत कोणतेही काम केले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, निधी मंजुर होऊनही संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे कामे होण्यास विलंब होत असल्याने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्या अनुषंगाने दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (२८-०१-२०२१)** :(१) हे अंशत: खरे आहे.
बेंबळा प्रकल्पा अंतर्गत मौ.पहुर हे गाव पुनर्वसीत झालेले असून सदर गावाचे मौ.पहुर-१ ता.यवतमाळ व मौ.पहुर-२ ता.बाभुळगांव असे २ ठिकाणी पुनर्वसन करण्यात आलेले आहे.

मौ.पहुर-१ ता.यवतमाळ मधील मुळ १८ नागरी सुविधांपैकी १६ नागरी सुविधांची कामे पूर्ण झालेली असून बसस्थानक व स्मशानभूमीकरीताचा पोच रस्ता या दोन सुविधांची कामे प्रगतीपथावर आहेत.

मौ. पहुर-२ ता.बाभुळगाव मधील मुळ १८ नागरी सुविधांची कामे पूर्ण झालेली असून सदर गाव जिल्हा परिषद यवतमाळ यांचेकडे हस्तांतरीत झालेले आहे. बेंबळा प्रकल्पांतर्गत पुनर्वसीत गावतील नागरी सुविधांचे दुरुस्ती व आधुनिकीकरणा करीता शासनाने दर्जेदार नागरी सुविधा पुरविणे बाबतच्या प्रस्तावात मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उपरोक्त गावठांणात इमारत दुरुस्ती, नालीबांधकाम व रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

उपरोक्त प्रमाणे नमुद मौ. मौजे पहुर-२ मधील मूळ नागरी सुविधांची कामे पूर्ण करण्यात आलेली असून सदर पुनर्वसीत गावठाणाचे हस्तांतरण जिल्हा परिषद यवतमाळकडे करण्यात ओलेले आहे व दर्जेदार पुनर्वसना अंतर्गत आधुनिकीकरणाची कामे प्रगतीपथावर आहे.

मौजे पहूर-१ येथील मूळ नागरी सुविधेतील कामे तसेच आधुनिकीकरणाचे कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण झालेली असुन कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) हे खरे नाही.

बेंबळा प्रकल्पाअंतर्गत यवतमाळ जिल्हयातील एकूण २० गावांपैकी १७ गावे जिल्हा परिषद यवतमाळ यांना हस्तांतरीत झालेली आहेत. नागरी सुविधांच्या दुरुस्तीचे काम प्रस्तावित असून २० गावांपैकी २० गावांमधील कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) हे खरे नाही.

मूळ नागरी सुविधांची कामे पूर्ण झालेली असून दर्जेदार नागरी सुविधांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांची होणारी गैरसोय**

**(१६) ७७३५ (१३-०४-२०२०). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालयात भौतिक सुविधांची कमतरता असुन या तालुक्यातील ७ प्राथमिक आरोग्य केंद्र व ३४ उपकेंद्रामार्फतच्या सुविधांची गरज असल्याचे तसेच कर्मचा-यांची रिक्त पदे भरण्यात आली नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुखेड शहरामध्ये १०० खाटांची सुसज्ज अशी उपजिल्हा रुग्णालयाची इमारत आहे परंतु तेथील वैद्यकीय अधिक्षक पद मागील काही महिन्यापासून रिक्त असल्याने आवश्यक सोयी सुविधा रुग्णांना मिळत नसून खाटा अभावी रुग्णांना जमिनीवर झोपवुन त्यांच्यावर उपचार करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भौतिक सुविधा पुरविण्याबाबत तसेच कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२५-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

वैद्यकीय अधिक्षक पद रिक्त असून जेष्ठतम वैदयकिय अधिकाऱ्यांकडे या पदांचा अतिरिक्त कार्यभार देण्यांत आला आहे. मोतिबिंदू शस्त्रक्रियेसाठी मोठया प्रमाणात रुग्ण येतात. अशा रुग्णास एक दिवसासाठी दाखल करण्यांत येते. नियमित खाटा भरल्या असल्यास फ्लोअरबेड देण्यात येते.

(३) भौतिक सुविधा पुरविण्यांत आलेल्या असून रिक्तपदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**आर्वी (जि.वर्धा) मतदार क्षेत्रातील निम्न वर्धा प्रकल्पाच्या बॅक वॉटरमुळे होणारे नुकसान**

**(१७) ९५९२ (२८-०५-२०२०). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी (जि.वर्धा) मतदार क्षेत्रातील लोअर वर्धा प्रकल्प वर्धा नदीवर असून या प्रकल्पाच्या बॅक वॉटरमुळे पावसात नदीला पुर येऊन नदी किनाऱ्यावरील गावे पुराच्या पाण्याने बाधित असुन त्यामध्ये राजापुर, मौजा निंबोली, मौजा देऊरवाडा, मौजा टाकरखेडा, मौजा लाडेगांव, मौजा टोणा, मौजा सर्कसपुर या गावातील नदी किनाऱ्यावरील घरांचे नुकसान होत असून त्यांना दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरीत करावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाकळी नदी, आडनदी किनाऱ्यावर असणारी गावे, मौजा शिरपुर बोके, मौजा वर्धमनेरी, मौजा नांदोरा, मौजा बेलोरा (जळगांव), मौजा चिस्तुर, मौजा आनंदवाडी येथे बॅक वॉटरमुळे पावसात पुराचे पाणी शेतामध्ये जाऊन पिकांचे नुकसान होते, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच आर्वी नगर परिषद क्षेत्रातील गाव नदी किनाऱ्यावरील दोन्ही बाजुला असलेले घरे दुकान निम्न वर्धा प्रकल्पाचे बॅक वॉटरमुळे दिनांक ५ सप्टेंबर, २०१२ रोजी आलेल्या पुरात राऊत बाई, अशोक सवाई, नरेंद्र राऊत व प्रथमेश नरेश पेटकर यांचा मृत्यू झाला व नागकिरांच्या पशुधनासह मालमत्तेचे नुकसान झाले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, निम्न वर्धा प्रकल्पाच्या बॅक वॉटरेमुळे होणारे नुकसान थांबविण्यासाठी पुर संरक्षण भिंत बांधण्याची मागणी लोकप्रतिनीधींनी दिनांक २८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर मागणीनुसार पुर संरक्षण भिंत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (२८-०१-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही. दि. ५ सप्टेंबर, २०१२ रोजी निम्न वर्धा धरणात पुर्ण संचय पातळीपर्यंत पाणी साठा करण्यात आला नव्हता. तसेच निम्न वर्धा प्रकल्पाच्या पाश्चजलाच्या (बॅक वॉटर) क्षेत्रात आर्वी शहर येत नाही. दिनांक ०५/०९/२०१२ ला झालेल्या अति वृष्टीमुळे पुर परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे आर्वी शहरातील गाव नदीला आलेल्या पुरामुळे झालेल्या नदी किनाऱ्यावरील घरांचे नुकसान व जिवित हानी व त्यानुषंगाने देण्यात आर्थिक मदती बाबतची

माहिती मदत व पुनर्वसन विभागाकडुन प्राप्त झाली आहे.

(४) हे खरे आहे.

(५) पुर संरक्षण भिंत बांधणेबाबत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**आर्वी (जि.वर्धा) विधानसभा क्षेत्रातील धाम नदी प्रकल्पावरून सुक्ष्म सिंचन योजना कार्यान्वित करणेबाबत**

**(१८) ९७९४ (०३-०६-२०२०). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी (जि.वर्धा) विधानसभा क्षेत्रातील धाम नदी प्रकल्पाच्या भिंतीची उंची वाढवण्याच्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिलेली असून त्यामुळे प्रकल्पात पाण्याचा साठा मोठ्या प्रमाणात उपलब्ध होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धाम नदी प्रकल्पावरून सुक्ष्म सिंचन योजना कार्यान्वित करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ मे, २०२० रोजीच्या पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पावरून सुक्ष्म सिंचन योजना कार्यान्वित केल्यास आर्वी तालुक्यातील मौजा तळेगांव रघुजी, चांदणी, बोथली, तरोडा, गुमगांव, पिंपळखुटा, बेढोणा व इतर गावे तसेच कारंजा तालुक्यातील मौजा लादगड, सहेली, सुसुंद, बोरगांव गोंडी, मासोद, बांगडापुर, नांदोरा, कन्नमवारग्राम या आदिवासी भागातील शेतकऱ्यांच्या जमीनीला सिंचनाची सोय उपलब्ध होऊ शकते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, धाम नदी प्रकल्पावरुन सुक्ष्म सिंचन योजना कार्यान्वित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (२९-०१-२०२१) :** (१) होय.

धाम धरणाच्या प्रस्तावित १.९० मी. उंचीवाढीमुळे १९.५४ दलघमी अतिरिक्त पाणीसाठा निर्माण होणार असून सदर कामास शासनाने दि. २७.०४.२००६ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे.

(२) नाही.

(३) नाही.

धाम प्रकल्पावरून सूक्ष्म सिंचन योजना कार्यान्वित करणे शक्य नाही तथापि जलसंपदा विभाग शासन निर्णय दि. २१.११.२००२ मधील तरतूदीनुसार वैयक्तिक उपसा सिंचनाद्‌वारे सिंचनाची सोय करणे शक्य आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### सिंधुदुर्ग जिल्ह्यात सामुदाय आरोग्य अधिकारी यांच्या नेमणूका करण्याबाबत

**(१९) ११३८० (०९-०९-२०२०). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना विषाणूच्या संसंर्गामूळे सामुदाय आरोग्य अधिकारी पदाच्या तोंडी परीक्षा न झाल्याने डॉक्टरांच्या परीक्षेचा निकाल थांबविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पश्चिम महाराष्ट्रातील तीन जिल्ह्यात या सामुदाय आरोग्य अधिकारी म्हणून शासकीय रुग्णालयात डॉक्टरांना प्रशासनाने नेमणुका दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याच धर्तीवर कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यात डॉक्टरांच्या कमतरतेमुळे या डॉक्टरांची नेमणूक करण्यात यावी अशी मागणी तेथील स्थानिक नागरीक तसेच राजकीय पक्षाचे अध्यक्ष, वैभववाडी यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे हि खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (०१-०२-२०२१) :**(१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

पुणे, सातारा व सांगली येथील उपकेंद्रात विहीत परीक्षा उत्तीर्ण समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांची नेमणूक झाली आहे.

(३) हे खरे नाही.

तथापि विहीत परीक्षा उत्तीर्ण ४७ समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांच्या नेमणूका सिंधुदुर्ग जिल्हयात झाल्या आहेत.

(४) प्रश्न उदभवत नाही.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

### राज्यात कोराना संसर्ग रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

**(२०) ११३८२ (११-०८-२०२०). श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्रीमती मुक्ता टिळक (कसबापेठ), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा):** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यात विशषत: मुंबई,पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक यासारख्या महानगरामध्ये कोरोना या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव वाढला असून राज्यात या आजाराचे एकूण एक लाख ऐशी हजार रुग्ण असुन सक्रिय रुग्ण एकोणऐशी हजार असून आठ हजार त्रेपन्न रुग्णांचा मृत्यू झाला असल्याचे दिनांक २ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना प्रभावीत भागात व अन्य ठिकाणी काम करणाऱ्या डॉक्टर, परिचारीका व आशा सेविका यांना अद्यापही पी.पी.ई किटस व फेस शिल्ड सारखी अत्यावश्यक साहित्य सामुग्री मिळाली नसल्याने अनेक आरोग्य सेवा पूरवणारे डॉक्टर, परिचारीका, आशा सेविका व कर्मचाऱ्यांना कोरोना संसर्ग झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात कोरोना आजाराच्या चाचण्या करण्यासाठी पोस्ट एक्सपोजर प्रिवेंटीव्ह (पीईपी) कीट्स, उपचारांसाठी औषधे, प्रयोगशाळेच्या चाचण्या, समुपदेशन तसेच खासगी डॉक्टरांना पीईपी किट्स दिले तर ते जास्तीत जास्त रुग्णांची सेवा करू शकतील यासंदर्भात लोकप्रतिनीधींनी मा.आरोग्य मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोरोना आजारारच्या उपचारासाठी शासनाने दर निर्धारित केलेल असून खासगी रुग्णालयातील ८० टक्के खाटा शासनाने व पालिकेने राखीव ठेवून देखील रुग्णांना खाटा उपलब्ध न होणे तसेच काही खासगी रुग्णालयाकडून निर्धारित किमतीच्या व्यतिरिक्त जादा दर आकारणी केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, करोनाग्रस्त रुग्णाकडून जादा दर आकारणी करण्या-या खासगी रुग्णालयाच्या विरोधात आलेल्या तक्रारीचा निपटारा करण्याकरिता सार्वजनिक आरोग्य प्रशासनाने विविध खासगी रुग्णालयासाठी लेखापरीक्षकाची नेमणूक केली असून रुग्णाशी समन्वय साधण्यासाठी शासनाने पाच सनदी अधिकाऱ्याची नियुक्ती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास,कोरोना आजाराच्या चाचण्या करण्यासाठी पोस्ट एक्सपोजर प्रिवेंटीव्ह (पीईपी) कीट्स व कोरोना प्रभावित भागात व अन्य ठिकाणी काम करणाऱ्या डॉक्टर, परिचारीका व आशा सेविका यांना पी.पी.ई किट व फेस शिल्ड व इतर साहित्य सामुग्री उपलब्ध करुन देणे, खासगी रुग्णालयातील दर नियंत्रित ठेवून व राखीव खाटांचा लाभ रुग्णांना होण्यासाठी उपाययोजना करणे तसेच या आजारावर नियंत्रण मिळविण्याकरीता व भविष्यात या आजाराचा प्रतिबंध करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२५-०१-२०२१) :** (१) २ जुलै २०२० रोजी राज्यामध्ये एकूण १,८६,६२६ रुग्णांचे कोरोना आजारासाठीचे निदान झाले आहे. त्यापैकी ७७,२६० सक्रीय रुग्ण होते. राज्यामध्ये ११७८ रुग्णांचा कोविड या आजाराने मृत्यू झाल्याचे निष्पन्न होत आहे. २ जुलै २०२० पर्यंत मुंबई मनपा अंतर्गत ५०६६१, पुणे मनपा अंतर्गत १९५३६, नागपूर मनपा अंतर्गत १३६७, औरंगाबाद मनपा अंतर्गत ४६८८, नाशिक मनपा अंतर्गत २४९१ कोरोना बाधीत रुग्णांचे निदान झाले होते.

(२) दि.४.९.२०२० रोजीची कोविड पोर्टलवरुन घेतलेलया आकडेवारी नुसार संपूर्ण राज्यामध्ये पीपीई- १०,४२,४२९ ट्रिपल लेअर मास्क ८५,६३,३६५ एन ९५ मास्क - २१,७२,९०३ उपलब्ध आहेत. आरोग्य सेवा पुरविणा-या डॉक्टर, परिचारिका, आशा स्वयंसेविका यांना पीपीई किट, एन ९५ मास्क व ट्रिपल लेअर मास्क योग्य प्रमाणत वितरीत करण्यात आले आहेत. पीपीई किट, मास्क उपलब्ध नसल्याने डॉक्टर, परिचारिका अथवा आशांना कोरोनाचा संसर्ग झाला नाही. तथापि, जिल्ह्यांकडून प्राप्त अहवाल नुसार २१२७ डॉक्टर, १८७९ परिचारिका व ३१४४ इतर आरोग्य कर्मचा-यांना कोरोनाचा संसर्ग झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) हे खरे आहे.

(४) काही खाजगी रुग्णालयांकडून निर्धारित किमतीच्या व्यतिरिक्त रुग्णांकडून जादा दर आकारणी केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे.

(५) दि.१४.०९.२०२० च्या प्राप्त अहवालानुसार ज्या नगरपालिकेंतर्गत जादा दर आकारणीच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत त्यांचे स्तरावर याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

ठाणे महानगरपालिकेने जादा बील आकारणीच्या पडताळणी करण्यासाठी एक समिती स्थापन केली आहे. सदर समिती जादा आकारणी केलेल्या प्रत्येक प्रकरणी त्या रुग्णालयांकडून वसूली करत आहे.

मुंबई महानगरपालिका अंतर्गत मार्गदर्शक तत्वांचे खाजगी रुग्णालयांकडून उल्लंघन होत आहे किंवा कसे याकरीता शासनाने आयएएस अधिका-यांची नियुक्ती केली आहे. तसेच त्यांच्या अखत्यारीत म.न.पा.तर्फे खाजगी रुग्णालयात लेखापरिक्षण नेमण्यात आले आहेत. रुग्णांकडून जास्तीचे उपचार शुल्क आकारलेबाबत अनियमितता आढळून आल्याने ॲपेक्स हॉस्पिटल बोरीवली या रुग्णालयास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

नवी मुंबई म.न.पा. कडे कोविड - १९ च्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी अवास्तव आकारणी केल्या बद्दलच्या दोन तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. सदर रुग्णालयांची समितीमार्फत तपासणी व नियामानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

पुणे व पिंपरी-चिंचवड म.न.पा. यांनी जादा बिल आकारणीच्या पडताळणी करण्यासाठी सर्व मोठया रुग्णालयात लेखा परिक्षकांची नेमणूक केली आहे. रुग्णाचे बिल तपासून व जादाची रक्कम कमी करुन शासकीय नियमानुसार रुग्णास बिल देण्यात येते. त्याचा अहवाल पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांना प्राप्त होतो. म.न.पा. स्तरावर महानगरपालिका आयुक्त व जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांचेकडे रुग्णालय तक्रारीसंबंधी समिती नेमण्यात आली आहे. दि.३१.०८.२०२० च्या अधिसुचनेनुसार सर्व खाजगी रुग्णालयांना अधिसुचनेत निर्धारित केलेल्या दरानुसार पुर्वलेखा परिक्षित देयके देण्याबाबत निर्देशीत केले आहे.

(६) पीपीई किट, एन-९५ मास्क व ट्रिपल लेअर मास्कची आवश्यकतेनुसार खरेदी करण्यासाठी राज्यस्तरावरुन मंजूर कोविड पीआयपी अंतर्गत जिल्हयांना अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे. त्याचप्रमाणे जिल्हा स्तरावर उपलब्ध असलेल्या जिल्हा नियोजन निधी, आपत्ती व्यवस्थापन निधीतून आवश्यकतेनुसार खरेदी करण्यासाठीच्या सुचना देण्यात आल्या आहेत. यानुसार पीपीई -१०,४२,४२९ ट्रिपल लेअर मास्क-८५,६३,३६५ एन -९५ मास्क -२१,७२,९०३ उपलब्ध आहेत. खाजगी रुग्णालयांमध्ये उपचाराची दर आकारणीची कमाल मर्यादा निश्चित करण्यासाठीची अधिसूचना महाराष्ट्र राज्याच्या सार्व.आ.वि मार्फत २१ मे, २०२० अधिसूचना जारी करण्यात आली आहे. या अधिसूचनेतील तरतूदीनुसार खाजगी रुगणालयातील ८०% खाटांसाठी ही निश्चिती केलेली दर आकारणी लागू राहिल.

या आजाराचा प्रतिबंध करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहे.

१) फ्ल्यू सदृष्य रुग्णाचे/सारी रुग्णांचे नियमित सर्वेक्षण.

२) कोविड रुग्णालयातल सेवेकरिता त्रिस्तरीय रुग्णालय व्यवस्था.

३) पुरेसा औषध व साधन सामुग्री.

४) क्वॉरंटाईन सुविधांची पुरेशी उपलब्धता.

५) बाधीत रुग्णांच्या भौगोलिक क्षेत्रात कंटेन्मेंट झोन निश्चिती व घरोघर सर्वेक्षण.

६) बाधीत रुग्णांच्या निकट सहवासितांचा शोध.

७) गृह विलगीकरण व्यक्तींचे दैनंदिन सनियंत्रण.

८) कोविड नियंत्रणासाठी जनतेचे आरोग्य शिक्षण व लोकसहभाग.

९) वैदयकीय अधिकारी व आरोग्य कर्मचा-यांचे कोविड प्रतिबंध व नियंत्रणाबाबत प्रशिक्षण.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वैद्यकिय शाखेतील विद्यार्थ्यांच्या (BAMS-BHMS) (SUMAR EXM) परिक्षेचे वेळापत्रक जाहिर करण्याबाबत

**(२१) ११४०६ (१४-०९-२०२०). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकिय शाखेतील विद्यार्थ्यांच्या (BAMS-BHMS) उन्हाळी सत्रातील (SUMAR EXM) परिक्षेचे वेळापत्रक अद्यापपर्यंत जाहिर करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाखेतील विद्यार्थ्यांचे परिक्षाचे वेळापत्रक जाहीर न झाल्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भिती निर्माण झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी परीक्षांचे वेळापत्रक जाहिर करण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधिनी मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री यांना दिनांक २५ मे रोजी दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अमित विलासराव देशमुख (२५-०१-२०२१) :**(१) व (२) बीएएमएस-बीएचएमएस उन्हाळी-२०२० सत्रातील परीक्षेचे नियोजन दिनांक ०२/०६/२०२० पासून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडून करण्यात आले होते. तथापि, कोविड-१९ या साथीच्या आजारांच्या प्रादुर्भावाने उक्त परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या होत्या. तद्नंतर विद्यापीठ परिपत्रक दिनांक ०१/०७/२०२० अन्वये द्वितीय वर्ष आयुर्वेद, युनानी पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा दिनांक १७/०८/२०२० पासून नियोजित केले असल्याचे आणि दिनांक ०२/०७/२०२० रोजीच्या परिपत्रकान्वये प्रथम वर्ष आयुर्वेद, युनानी, होमिओपॅथी पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा दिनांक २९/०८/२०२० पासून नियोजित केल्या असल्याचे वेळापत्रक जाहिर करण्यात आले होते. तद्नंतर विद्यापीठ परिपत्रक दिनांक २१/०७/२०२० आणि २३/०७/२०२० अन्वये आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी या प्रथम ते चतुर्थ वर्गाच्या पदवी परीक्षा पुढे ढकलण्यात आल्याचे सर्व महाविद्यालयांना कळविण्यात आले होते.

आता, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी परिपत्रक दिनांक २५/०९/२०२०, तसेच, शुध्दिपत्रक दिनांक २१/१०/२०२० अन्वये विद्यापीठ उन्हाळी २०२०-प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष व तृतीय वर्ष पदवीपूर्व अभ्यासक्रम व विविध विद्यापीठ संलग्नित पदविका व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे वेळापत्रक जाहीर केले आहे.

(३) परीक्षा रद्द करण्याबाबत विविध निवेदने प्राप्त झाली आहेत.

(४) कोविड-१९ या साथरोगाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या परीक्षा घेण्याबाबत शासन पत्र दिनांक २४/०६/२०२० अन्वये वेळापत्रकाच्या अनुषंगाने सूचना देण्यात आल्या होत्या.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खासगी महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या वैद्यकीय अभ्यासक्रमाचे विद्यार्थ्यांना शुल्क प्रतिपूर्ती मिळण्याबाबत.**

**(२२) ११५२४ (०९-०९-२०२०). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खासगी महाविद्यालयात प्रवेश घ्यावा लागलेले वैद्यकीय अभ्यासक्रमाचे अडीचशेहून अधिक विद्यार्थी अद्याप पर्यत शुल्क प्रतिपूर्तीच्या प्रतीक्षेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरक्षणाच्या गोंधळामुळे व सातत्याने बदललेल्या निर्णयामुळे शासकीय महाविद्यालयाऐवजी खाजगी महाविद्यालयात प्रवेश घ्यावे लागलेल्या शेकडो विद्यार्थ्यांना शासनाकडून शासकीय महाविद्यालय आणि खाजगी महाविद्यालय यांच्यातील शुल्काचा फरक देण्याचे शासनाने जाहिर केले होते तथापि शुल्काचा फरक देण्यात आला नसून विद्यार्थ्यांचे पहिले वर्ष संपले आणि खाजगी संस्थानी दुस-या वर्षाचे लाखो रुपयाचे शुल्क मागण्याची सुरवात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात एस.ई.बी.सी आरक्षण लागू केल्यामुळे बाधित झालेल्या वैद्यकीय व दंत पदवी अभ्यास क्रमाच्या खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती करण्याबाबतचा प्रस्ताव, संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी दिनांक २५ नोव्हेंबर २०१९ रोजी वा त्यासुमारास शासनास सादर केला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विद्यार्थ्यांना शुल्क प्रतिपूर्ती तात्काळ देण्याबाबत योग्य तो निर्णय घेण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अमित विलासराव देशमुख (२५-०१-२०२१) :**(१), (२) व (३) शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील प्रवर्गास १० टक्के आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गास १२ टक्के आरक्षण प्रवेशामध्ये लागू करण्यात आले आहे. त्यानुषंगाने वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाकरिता १०६ आणि वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी ०६ असे खुल्या प्रवर्गातील एकूण ११२ उमेदवार बाधित झालेले आहेत. त्यासंदर्भात संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांच्याकडून शासनास माहिती सादर करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने शासन निर्णय दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२० नुसार शिक्षण शुल्काच्या प्रतिपूर्तीसंदर्भातील पात्रतेसाठीचे निकष व शुल्क प्रतिपूर्तीबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. सदर प्रतिपूर्तीच्या अनुषंगाने लेखाशीर्ष उपलब्ध करुन घेणे आणि आर्थिक तरतूद करणे यासंदर्भात पुढील कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

(४) शासन निर्णय दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२० नुसार शिक्षण शुल्काच्या प्रतिपूर्तीसंदर्भातील पात्रतेसाठीचे निकष व शुल्क प्रतिपूर्तीबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. त्यानुषंगाने एस.ई.बी.सी. आरक्षणामुळे बाधित झालेल्या विद्यार्थ्यांची यादी वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय स्तरावर तयार करण्यात आली असून शासन निर्णयातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यात श्रीरामकृष्ण गोदावरी सहकारी उपसा जलसिंचन योजना कार्यान्वित करणेबाबत**

**(२३) ११६३२ (०८-०९-२०२०). श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यात सन १९८७ मध्ये १४ गावातील ४ वेगवेगळ्या सहकारी उपसा जलसिंचन संस्था स्थापन करून नाबार्ड, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या मान्यतेने औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कर्ज उभारणी करून श्रीरामकृष्ण गोदावरी सहकारी उपसा जलसिंचन योजना सुरु केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना सन १९९०-९१ ला कार्यान्वित झाल्यानंतर या योजनेतील १४ गावातील ११ हजार एकर क्षेत्र सिंचनाखाली येऊन परिसरातील ३० गावातील पाणी टंचाई दूर होऊन पाणी टंचाईवरील होणारा खर्च पूर्णपणे कमी झाला होता परंतु कालांतराने काही तांत्रिक अडचणीमुळे ही योजना बंद पडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी गोदावरी विकास महामंडळाने ५ कोटी ८९ लक्ष रुपये अनुदान मंजूर केले असून मंजूर करण्यात आलेले अनुदान अद्यापही उक्त योजनेवर खर्च करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर उपसा सिंचन योजना पुन्हा कार्यान्वित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सध्य:स्थिति काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (२७-०१-२०२१) :** (१) होय, खरे आहे. रामकृष्ण गोदावरी सहाकारी उपसा जलसिंचन योजना दहेगांव यांस दि औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहाकारी बँक, औरंगाबाद यांच्याकडून कर्ज घेऊन योजनेचे बांधकाम केलेले आहे. व जलसंपदा विभागाने फक्त योजनेस पाणी परवानगी दिलेली आहे.

(२) होय, सदर योजनेवरील बँकेचे कर्ज, विद्युत पुरवठा देयकाची थकबाकी व जलसंपदा विभागाची पाणी पटटीची थकबाकी न भरल्यामुळे ही योजना बंद आहे.

(३) हि योजना पुन्हा सुरु करण्याच्या दृष्टिकोनातुन शासन निर्णय क्र. बैठक-२०१७/ (प्र.क्र.१९३/ २०१७) सिंचन व्यवस्थापन (म) मंत्रालय, मुंबई दि.०२/०५/२०१८ नुसार शासन निर्णय अन्वये पंप हॉऊस टप्पा क्र.१ व २ येथील प्रत्येकी २ पंप कार्यान्वित करण्यासाठी औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस रु. ५.७९ कोटी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या उपलब्ध निधीतुन अनुदान म्हणुन मंजुर झाले. त्यापैकी रु. ४.६३ कोटी जायकवाडी पाटबंधारे विभाग नाथनगर (उत्तर) पैठण यांचेकडुन दिनांक २५/०९/२०१८ रोजी औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, औरंगाबाद या बँकेस देण्यात आले. बँकेने या ४.६३ कोटी वितरीत निधीपैकी आजपावेतो रु. ४.६१५ कोटी खर्च केला आहे.यात टप्पा क्र. १ व टप्पा २, मुख्य रायझिंग पाईपलाईन ची दुरस्ती करण्यात आली. ही योजना कार्यान्वित करणे बाबतची सर्व कार्यवाही बँके मार्फत करण्यात येते. जलसंपदा विभागामार्फत फक्त पाणी वापराची परवानगी दिलेली आहे.

(४) ही योजना कार्यान्वित करण्यासाठी उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जिल्हा नियोजन मंडळाच्या निधीतून ५०५४ हेडखाली खर्च होणारा निधी पूर्ववत जिल्हा नियोजन मंडळाकडून खर्च करणेबाबत**

**(२४) ११६७० (०८-०९-२०२०). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा नियोजन मंडळाच्या निधीतून ५०५४ या हेडखाली खर्च होणारा निधी जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा नियोजन मंडळाच्या सदस्यांनी सूचविलेल्या कामांसाठी निधी मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ५०५४ चा निधी पूर्ववत जिल्हा नियोजन मंडळाकडून खर्च करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (०२-०२-२०२१) :** (१) हे खरे नाही

जिल्हा नियोजन मंडळाच्या निधीतून ५०५४ या हेडखाली इतर जिल्हा मार्गाच्या विकास व मजबुतीकरणासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. इतर जिल्हा मार्ग हे जिल्हा परिषदांच्या अखत्यारीत येत असल्याने ५०५४ या हेडखाली जिल्हा परिषदांना निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. तथापि, जिल्हा नियोजन समितीकडील रस्ते क्षेत्रासाठी लेखाशिर्ष ३०५४ व ५०५४ अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीतून ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्गाच्या मंजूरी व अंमलबजावणीकरीता ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक - जिपर २०१८/प्र.क्र.३३५/ बांधकाम-३, दिनांक ६/१०/२०१८ अन्वये जिल्हयाच्या पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती व प्रस्तुत समितीस अंमलबजावणी यंत्रणा निवडण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले होते. त्यानुसार ३०५४ किंवा ५०५४ लेखाशिर्षाखालील रस्त्यांची कामे जिल्हा परिषद अथवा सार्वजनिक बांधकाम विभागांकडूनही कार्यान्वीत करण्याबाबत तरतूद करण्यात आली होती. या निर्णयाविरुध्द उच्च न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ठ असून सध्या या शासन निर्णयास स्थगिती आहे.

(२) हे खरे नाही

(३) व (४) प्रश्न उदभवत नाही

---

**ठाणे जिल्हयातील ग्रामिण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळांकरिता खरेदी करण्यात आलेले प्रोजेक्टर्स निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**

**(२५) ११८९९ (१६-०७-२०२०). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील ग्रामिण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळांना डिजिटल करण्यासाठी प्रोजेक्टर्स पुरविण्याबाबत सन २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निविदा प्रक्रिया राबवून केजीएम सिस्टीम सोल्युशन या पुरवठादारास हे कंत्राट देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पुरवठादाराकडून चायनाच्या HIVIST-P९ या कंपनीचे जवळपास १४४ प्रोजेक्टर्स ठाणे ग्रामीण भागातील १४४ शाळांना पुरविण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रोजेक्टर्स हे अत्यंत दुय्यम दर्जाचे असल्याने सर्व प्रोजेक्टर्स सद्य:स्थितीत वापरात नसल्याने या प्रकरणी संबंधित चायनिज कंपनीशी संपर्क साधला असता प्रोजेकटर्सचा असा कोणताच पुरवठा सदरहू कंपनीकडून भारतात केला नसल्याचा तसेच

केजीएम सिस्टीम सोल्युशन या पुरवठादाराशी कोणताच संबंध नसल्याचे संबंधित कंपनीकडून निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी खरेदी प्रक्रिया करताना नियुक्त केलेल्या तांत्रिक समिती मधील मुख्य लेखा व वित्त अधिकारी, शिक्षणाधिकारी, तांत्रिक सहाय्यक सल्लागार, शिक्षक यांनी संबंधित पुरवठादारासोबत संगनमत करून अत्यंत निकृष्ट दर्जाच्या व बनावट प्रोजेक्टर्सना मंजूरी देवून कोटयवधी रूपयांचा आर्थिक गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार या प्रकरणाची तपासणी लाचलुचपत खात्याकडून करून संबंधित दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांनी केलेल्या अपहाराची रक्कम त्यांचेकडून वसुल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०२-०२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग नवी मुंबई कार्यालयाकडून चौकशी समिती गठीत केलेली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई विमानतळावर चीन मधून येणाऱ्या प्रवाशांच्या केलेल्या स्क्रिनिंगबाबत

**(२६) १२०२६ (०९-०९-२०२०). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विमानतळावर चीनमधून येणाऱ्या प्रवाशांची दिनांक २३ जानेवारी २०२० रोजी पासून तपासणी केली असता १७३९ रुग्णांचे स्क्रिनिंग करण्यात आले, त्यात मुंबईचे तीन तर पुण्याचे तीन असे मिळून सहा व्यक्ती कोरोन संशियत असल्याचे आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, कोरोन आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२५-०१-२०२१)** :(१) हे अंशत: खरे आहे.

कोरोना आजार डिसेंबर २०१९ मध्ये चीनमधील वुहान शहरात सर्व प्रथम आढळला. या प्रदेशातन या नवीन आजाराचा संसर्ग आपल्या देशात येऊ नये या साठी आंतरराष्ट्रीय विमानतळावर चीनमधुन येणा-या प्रवाशांचे स्क्रिनिंग सुरु करण्यात आले.

दिनांक २३ जानेवारी २०२० पर्यंत एकुण ८ विमानातुन आलेल्या १७८९ प्रवाशांची तपासणी करण्यात आली होती. त्यापैकी कोणालाही थर्मल स्क्रिनिंग मध्ये ताप आढळला नाही. या प्रवाशांपैकी महाराष्ट्रातील ६ प्रवासी होते. त्यापैकी मुंबईचे ३ व पुणे येथील ३ होते. हे प्रवासी कोरोना संशयित नव्हते. तथापि ते कोरोना साथ सुरु असलेल्या भागातुन आल्यामुळे पुढील १४ दिवसांकरिता त्यांना सर्वेक्षणाखाली ठेवण्यात आले.

(२) सदर चीनमधून आलेले प्रवासी हे पुर्णपणे लक्षणे विरहित होते त्यांनी आपल्या १४ दिवसांचा सर्वेक्षण कालावधी पुर्ण केला त्यामध्येही त्यांना कोणतेही लक्षणे आढळली नाहीत.

(३) कोरोना प्रतिबंध व नियंत्रणासाठी पुढील उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

१) बाधित भागातुन येणा-या प्रवाशंची विमानतळे व बंदरावर तपासणी.

२) लक्षणे असलेल्या प्रवाशांचे विलगीकरण

३) बाधित भागातुन आलेल्या लक्षण विरहित प्रवाशांचा १४ दिवसांकरिता पाठपुरावा.

४) फ्लयू सदृष्य रुग्णांचे सर्वेक्षण.

५) बाधित रुग्णाच्या निकट सहवासितांचा शोध, निदान व विलगीकरण.

६) बाधित रुग्णाच्या रहिवासी भागात कंटेनमेंट क्षेत्र घोषित करुन सर्वेक्षण व आवश्यकतेनुसार मानवी हालचालींवर निर्बंध.

७) कोविड निदानासाठी पुरेशा प्रयोगशाळा.

८) कोविड रुग्णावर उपचारासाठी त्रिस्तरीय रचनेमध्ये पुरेशी रुग्णालय, खाटा व गंभीर रुग्णांसाठी आवश्यक उपचार सुविधा.

९) जोखमीच्या भागातून आलेल्या व्यक्तींचे घरी /संस्थात्मक पातळीवर क्वॉरंटाईन.

१०) कोविड रुग्णोपचार करणा-या डॉक्टर्स आणि आरोग्य कर्मचा-यांसाठी पुरेशी संरक्षक साधने

११) औषध व साधन सामुग्रीचा पुरेसा साठा.

१२) कोविड प्रतिबंध व नियंत्रणासाठी जनतेनचे प्रबोधन.

(४) प्रश्न उभ्द्वत नाही.

---

**आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना विमा संरक्षणाची मुदत वाढविणेबाबत.**

**(२७) १२१५४ (१४-०९-२०२०). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरोग्य विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना शासनाने रुपये ५० लाख इतके विमा संरक्षण केवळ ९० दिवसा (३ महीने) करीता दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना प्रादुर्भावाचा सामना किमान एक ते दोन वर्ष करावा लागणार असून त्याच्याशी प्रत्यक्ष जीवावर उदार होऊन लढा देणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांना ९० दिवसानंतरही शासन विमा संरक्षण देणार आहे काय,

(३) असल्यास, आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना विमा संरक्षणाची मुदत वाढविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२५-०१-२०२१) :** (१) हे अंशतः खरे आहे.

कोविड -१९ सर्वेक्षण, उपचार याकरिता कार्यरत आरोग्य कर्मचा-यांना शासनाने रु.५० लाख इतके विमा संरक्षण दि.२८.०३.२०२० च्या भारत सरकारच्या आदेशानुसार ९० दिवसांकरिता होते

तथापि, केंद्र सरकारच्या २६ जून २०२० च्या आदेशानुसार त्यास ९० दिवसांची मुदतवाढ देण्यता आली आहे.

(२) सध्या या विमा योजनेस ९० दिवसांची म्हणजेच माहे ३१ डिसेंबर, २०२० अखेरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. आरोग्य कर्मचा-याव्यतिरिक्त कोरोनाच्या सार्वत्रिक साथीमध्ये सर्वेक्षण, शोध, माग काढणे, प्रतिबंध, चाचणी, उपचार व मदत कार्य यांचेशी संबंधित कर्तव्य बजावित असताना कर्मचा-याचा दुर्दैवाने मृत्यू झाल्यास आपत्कालीन सेवेतील कर्मचा-यांसाठी वित्त विभागाने दि.२९ मे, २०२० रोजी निर्गमित केलेल्या शासननिर्णयानुसार या कर्मचा-यांना ५० लाखाचे विमा संरक्षण /सानुग्रह अनुज्ञेय करण्यात आले आहे.

(३) दि.२६ जून, २०२० च्या केंद्र सरकारच्या आदेशानुसार या योजनेची मुदत ९० दिवसांनी माहे ३१ डिसेंबर, २०२० अखेरपर्यंत वाढविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा सामान्य रुग्णालय बुलढाणा येथील महिला प्रसुति कक्षाच्या दुरवस्थेबाबत

**(२८) १२२८५ (१४-०९-२०२०). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा सामान्य रुग्णालय, बुलढाणा येथील महिला प्रसुति कक्षाची दुरवस्था झाली असल्याने महिला रुग्णांची गैरसोय होत असल्याची बाब दिनांक १५ जून २०२० रोजी व त्या सुमारास निदर्शनास आली, खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त रुग्णालयामधील महिला प्रसूती कक्षाच्या आत मध्ये वराह प्रवेश करीत असून शस्त्रक्रिया विभागातील व परिसरातील रक्त प्राषण करीत असल्याची गंभीर बाब दिनांक २३ जून २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय निष्पन्न झाले,

(४) असल्यास, जिल्हा सामान्य रुग्णालय, बुलढाणा येथील स्त्री प्रसुती कक्षाच्या सुरक्षितेकडे दूर्लक्ष करण्या-या संबधितावर कारवाई करण्यासह व महिला रुग्णांच्या सुरक्षितेसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२-०२-२०२१) :** (१) नाही,हे खरे नाही.

(२) नाही.हे खरे नाही.

रुग्णाच्या नातेवाईकांनी बाहेर टाकलेले पॅड वराहांनी प्रसुती कक्षा जवळील व-हांड्यात आणलेले होते.

(३) जिल्हा शल्याचिकित्सक यांनी चौकशी केली आहे.

चौकशीमध्ये रुग्णाचे नातवाईकांनी बाहेर टाकलेले पॅड वराहांनी प्रसुती कक्षा जवळील व-हांड्यात आणलेले होते.

(४) जिल्हा शल्य चिकित्सक,बुलढाणा यांनी सुरक्षा रक्षक व कर्मचारी यांना ज्ञापन देवुन खुलासा मागविण्यात आलेला आहे,खुलासा प्राप्त होताच पुढील प्रशासकिय कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

## राज्यात करोनाचा संसर्गाने मृत्यू झालेल्या रुग्णसेवकांच्या कुटुबियांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(२९) १२४७१ (१०-०९-२०२०). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यात कोरोना विषाणूचा संसर्गाच्या काळात रुग्णसेवा देताना १८ डॉक्टरांचा मृत्यू झाला असून १२०० हून अधिक रुग्णसेवक करोनाबाधित झाले असल्याचे माहे जून २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यात आत्ता पर्यंत अत्यावश्यक सेवा बजावणाऱ्या किती अधिकारी व कर्मचारी यांचा तसेच सर्व सामान्य नागरिकांचा कोरोनामुळे मृत्यू झाला तसेच राज्यात एकूण किती रुग्ण पोझिटिव्ह आहेत,

(३) असल्यास, राज्यातील रुग्णसेवा देताना होत असलेले मृत्यू रोखण्यासाठी डॉक्टरांना आवश्यक सुरक्षा साधनसामुग्री उपलब्ध करून देण्यासह रुग्णसेवा देताना मृत्यू पावलेल्या डॉक्टरांच्या व अधिकारी व कर्मचा-याच्या कुटुबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२५-०१-२०२१) :**(१) हे अंशत: खरे आहे.

दि. २२ जुलै, २०२० च्या आकडेवारीनुसार राज्यात कोरोना विषाणूच्या संसर्गाच्या काळात रुग्णसेवा देताना १० डॉक्टर्स, २ नर्सेस व ३३ इतर संवर्गातील कर्मचा-यांचा मृत्यू झाला आहे तर एकूण ३५१० डॉक्टर्स, नर्सेस आणि इतर रुग्णसेवक कोरोना बाधित आढळले आहेत.

(२) दि.२२ जुलै, २०२० च्या आकडेवारीनुसार राज्यात अत्यावश्यक सेवा बजावणा-या ४५ अधिकारी व कर्मचारी यांचा मृत्यू झाला असून, दि.२४ जुलै, २०२० पर्यंत राज्यात ३ लाख ५७ हजार ११७ रुग्ण आढळले असून त्यापैकी १३,१३२ रुग्णांचा मृत्यू झाला आहे.

(३) रुग्ण सेवा देणा-या डॉक्टर, नर्सेस आणि इतर रुग्णसेवकांना पी पी ई किटस्, एन ९५ मास्क, सर्जिकल मास्क आदि आवश्यक संरक्षक साधन सामुग्री पुरेशा प्रमाणात पुरविण्यात येत आहे. प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज योजनेअंतर्गत कोविड आजारावर तपासणी व उपचार करणा-या सर्व डॉक्टर्स व इतर सर्व संबंधितांना विमा संरक्षण अनुज्ञेय आहे. या योजने अंतर्गत रु.५० लाख इतक्या रकमेचे विमा कवच अनुज्ञेय करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इगतपुरी-त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथील सिंचन प्रकल्प आणि कालवे, पाटबंधारे यांची दुरुस्ती करण्यासाठी निधी मंजूर करणेबाबत

**(३०) १२६४८ (१०-०९-२०२०). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपूरी-त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथे अनेक मोठे, मध्यम व लघु सिंचन प्रकल्प असून या प्रकल्पांनामध्ये गळती होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलसपंदा विभागातंर्गत इगतपूरी आणि त्र्यंबकेश्वर तालुक्यात ४ मोठे, १ मध्यम व १० लघु असे एकुण १५ पुर्ण झालेले प्रकल्प असून या प्रकल्पांच्या सिंचन विमोचक द्वारे/आपात्कालीन द्वारे यातून गळती होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे,
(३) तसेच, मोठे/मध्यम प्रकल्पांच्या गळती दुरुस्तीकरिता आवश्यक कामे सन २०१९-२० मध्ये विशेष दुरुस्तीतंर्गत प्रस्तावित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या दुरुस्तीस झालेला मागील खर्चाचा तपशील घेऊन इगतपुरी-त्र्यंबकेश्वर येथील सिंचन प्रकल्प आणि कालवे, पाटबंधारे यांची तात्काळ दुरुस्ती करण्यासाठी निधी मंजूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (२९-०१-२०२१) :** (१) होय अंशत: खरे आहे.
(२) सदर गळती धरणाचे मुख्य विमोचक, स्लूईस दरवाजे व पूरनियंत्रक दरवाजे यातून होते.
(३) मोठया, मध्यम व लपा प्रकल्पाचे विशेष दुरुस्तीसाठी सन २०१९-२० मध्ये रु.७६.११ लक्षची तरतूद करण्यात आली आहे.
(४) इगतपूरी व त्र्यंबकेश्वर तालुक्यातील गळती असलेल्या १ मोठी व ३ लघुपाटबंधारे प्रकल्पांची कामे विशेष दुरुस्तीअंतर्गत प्रस्तावित करण्याच्या अनुषंगाने महामंडळ स्तरावर आवश्यक कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात पदव्युत्तराचे शिक्षण घेणाऱ्या निवासी डॉक्टरांचे विद्यावेतन प्रलंबित असलेबाबत

**(३१) १२७७६ (१४-०९-२०२०). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकीय महाविद्याल व रुग्णालयात वैद्यकीय शिक्षण घेऊन पदव्युत्तराचे शिक्षण घेणाऱ्या डॉक्टरांची संख्या जवळपास ३५० ते ४०० इतकी आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवासी डॉक्टरांना दोन महिन्यांपासून विद्यावेतन मिळाले नसल्याचे माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे हि खरे आहे काय,
(३) असल्यास, पदव्युत्तराचे शिक्षण घेणाऱ्या डॉक्टरांना विद्यावेतन वाढवून मिळण्याबाबतची मागणी असताना देखिल निवासी डॉक्टरांना सद्यस्थित मिळणारे विद्यावेतन न मिळाल्याने आर्थिक अडचणीमुळे त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात वैद्यकीय शिक्षण घेऊन पदव्युत्तराचे शिक्षण घेणाऱ्या डॉक्टरांचे विद्यावेतन तात्काळ अदा करणेसह वाढीव विद्यावेतनही मिळावे या मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अमित विलासराव देशमुख (२५-०१-२०२१) :**(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद येथे पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या कनिष्ठ निवासी -१,२,३ या विद्यार्थ्यांची एकूण संख्या ४३९ इतकी आहे.

(२) नाही, हे खरे नाही.
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद येथील पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या निवासी डॉक्टराचे विद्यावेतन नियमितपणे अदा करण्यात आलेले आहे. निवासी डॉक्टरांचे माहे मार्च,२०२० ते सप्टेंबर,२०२० पर्यंतचे विद्यावेतन अदा करण्यात आले असून कोणत्याही महिन्याचे विद्यावेतन प्रलंबित नाही.
(३) व (४) शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार तसेच सदर विद्यार्थ्यांचे विद्यावेतन अदा करण्यासाठी बीडीएस प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अनुदानातून विद्यार्थ्यांना विद्यावेतन अदा करण्यात आलेले आहे. सबब, याबाबत कोणतीही कार्यवाही प्रलंबित नाही.
शासन निर्णय दिनांक ०२/०९/२०२० अन्वये राज्यातील शासकीय वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे विद्यार्थी (कनिष्ठ निवासी १/२/३ व वरिष्ठ निवासी १/२/(३) यांच्या विद्यावेतनात दिनांक ०१ मे,२०२० पासून प्रतिमहा रुपये १०,०००/- इतकी ठोक वाढ लागू करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**कोठा (ता.कळंब, जि.यवतमाळ) येथील प्राथमीक आरोग्य केंद्रावर अंतःरूग्णसेवा बंद असल्याबाबत.**

**(३२) १२९३८ (१७-०७-२०२०). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोठा (ता.कळंब,जि.यवतमाळ) येथे प्राथमीक आरोग्य केंद्राची प्रशस्त ईमारत बांधण्यात आली असून सदर आरोग्य केंद्रात दहा ते पंधरा गावांच्या परिसरातमधील रुग्ण येत असून तेथे रूग्णा करिता अंतररूग्ण सेवा बंद असल्याने परिसरातुन येणा-या रूग्णांची गैरसोय होत असल्याचे दिनांक २० मे २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील आस्थापनेवर ११ पदे मंजूर असून देखिल तेथे तीन कर्मचारी कार्यरत आहेत व सदर केंद्राला स्वतंत्र दर्जा देण्यात आला नसून कर्मचा-यांचे नियमित वेतन इतर प्राथमिक आरोग्य केंद्रातून करण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केद्रात परिसरातील रूग्णाकरिता आंतररूग्ण सेवा सुरु करणे, स्वतंत्र दर्जा देणे,देखभाल दुरूस्ती करिता निधी,कर्मचा-यांचे वेतन प्राथमिक केंद्रावर नियीमत करणे ई.सुविधा मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२-०२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये १५ पदे असून सद्यस्थितीत ३ नियमित पदे व १ पद प्रतिनियुक्तिवर भरण्यात आले असून उर्वरीत पदे रिक्त आहेत.
(३) प्राथमिक आरोग्य केंद्रातील नियमीत पदे भरण्याकरीता जिल्हा परिषदेमार्फत जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.तथापी पदभरतीबाबत शासन आदेश नसल्याने पदभरती झालेली

नाही.तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील कंत्राटी पदे भरण्यासाठी बिंदूनामावली प्रमाणीत करण्याकरीता मा.सहा.आयुक्त (मागास वर्ग कक्ष), आयुक्त कार्यालय, अमरावती यांचेकडे सादर केलेली आहे.

नविन प्राथमिक आरोग्य केंद्र, कोठा येथील कार्यरत कर्मचा-यांचे मंजूर पदे ही पंचायत राज सेवार्थ प्रणालीमध्ये समाविष्ठ करणेबाबत प्रस्ताव जिल्हापरिषदेमार्फत ग्राम विकास विभागास सादर केला आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**आष्टी (शहीद) (ता.आर्वी,जि.वर्धा) येथील ग्रामीण रूग्णालयातील रिक्त पदे भरतीसंदर्भात**

**(३३) १३००१ (१४-०९-२०२०). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी (शहीद) (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील ग्रामीण रूग्णालयात डॉक्टर, टेक्निशीयन व इतर पदे रिक्त असून १०८ क्रमांकाची रूग्णवाहीका रुग्णांना उपलब्ध होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ग्रामीण रूग्णालयात डॉक्टर, टेक्निशीयन व इतर रिक्त पदांची तात्काळ भरती करण्यासह १०८ क्रमांकाची रूग्णवाहीका रुग्णांना उपलब्ध करून देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२९-०१-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय आष्टी, जि.वर्धा येथे गट-अ ते गट-ड संवर्गाची एकुण २३ पदे मंजुर असुन त्यापैकी ८ पदांवर नियमित अधिकारी / कर्मचारी कार्यरत आहेत व ८ पदांवर कंत्राटी तत्वावर कर्मचारी कार्यरत आहेत. सदर रुग्णालयात उपलब्ध वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी यांचेकडुन रुग्णांना आरोग्य सेवा पुरविली जाते.

सद्यस्थितीत प्राथमिक आरोग्य केंद्र, अंतोरा येथील १०२ क्रमांकाची रुग्णवाहीका व आष्टी तालुक्यातील १०८ क्रमांकाची रुग्णवाहीका उपकेंद्र, तळेगाव (शामज पंत) येथे उभी राहत असुन या दोन्ही रुग्णवाहीका ग्रामीण रुग्णालय, आष्टी येथे येणाऱ्या गरोदर माता व आपात्कालीन रुग्णांना संदर्भित करण्याकरिता उपलब्ध आहेत.

(२) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतनस्तर एस २(३) संवर्गातील विशेषज्ञांची एकुण ११७ रिक्त पदे सरळसेवेने भरती करणेसंदर्भात दि. २५.०१.२०२० रोजी जाहिरात देण्यात आली असून निवड प्रक्रियेची कार्यवाही सुरु आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक व विशेषज्ञ संवर्गातील (वेतनस्तर एस२ (३) पदावरील पदोन्नतीची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

शासन निर्णय दि. ०३.१२.२०१८ अन्वये संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करुन वैद्यकीय अधिकारी गट अ (वेतनस्तर एस २०) संवर्गाच्या रिक्त पदांवर कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली असून त्यानुसार जिल्हास्तरावर कार्यवाही सुरु आहे.

नागपूर परिमंडळातील नियमित प्रयोगशाळा तंत्रज्ञ, क्ष-किरण तंत्रज्ञ तसेच औषधी निर्माण अधिकारी या तांत्रिक संवर्गातील कर्मचाऱ्यांचे रिक्त पदांवर नियमित कर्मचारी उपलब्ध करुन देण्याकरिता दि. २२.०२.२०१९ रोजी जाहिरात देण्यात आली असुन पदभरतीची प्रक्रिया सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोविड - १९ या आजाराच्या रुग्णावर होणारे उपचार व्यवस्थेमधील त्रुटीबाबत**

**(३४) १३०४० (१०-०९-२०२०). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोविड - १९ या आजाराच्या रुग्णावर अतिशय वाईट पध्दतीने होणारे उपचार व मृतदेहांची हेळसांड होत असल्यांच्या मुद्दयावर मा. सर्वाच्च न्यायालयाने महाराष्ट्रासह इतर चार राज्यांना नोटीस बजावली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय रुग्णालयात खाटा उपलब्ध असतांना कोरोना रुग्णांना दाखल करुन न घेणे, या रुग्णांवर वाईट पध्दतीने उपचार होत असणे तसेच वेंटीग एरिया व वार्डाबाहेर मृतदेह ठेवून मृतदेहांची हेळसांड होत असणे, रुग्णाचे मृत्यूनंतर त्यांचे कुटुंबाना माहिती न देणे याबाबत सर्वाच्च न्यायालयाने महाराष्ट्रातही गंभीर परिस्थीती असल्याचे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त बाबीमध्ये शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२५-०१-२०२१) :**(१) होय, हे खरे आहे.

दि.१२.०६.२०२० रोजी सर्वोच्च न्यायालयाने कोविड-१९ रुग्णांच्या उपचार व्यवस्थेमधील त्रुटींबाबत दिल्ली आणि महाराष्ट्रासह काही राज्यांना सूमोटो रिट पिटिशन ७/२०२० द्वारे शपथपत्र दाखल करण्याबाबत कळविले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्रासह इतर राज्यामध्ये कोविड-१९ रुग्णांवर अधिक संवेदनशीलतेने उपचार व्हावेत आणि मृतदेहांवर सम्नानाने अंतिम संस्कार केले जावेत, असा अभिप्राय मा.सर्वोच्च न्यायालयाने नोंदविला होता.

(३) शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार १ जुलै, २०२० रोजी शासन निर्णय निर्गमित केला असून त्यानुसार कोविड-१९ रुगणां उपचार देणा-या सर्व रुग्णालयांची नियमित पणे तपासणी करण्यासाठी जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली तज्ञांची समिती स्थापन करण्यात आलेली आहे. मुंबई मनपासाठी ही समिती महानगरपालिका आयुक्तांच्या अध्यक्षेखाली स्थापान करण्यात आलेली आहे. या समितीची जबाबदारी पुढीलप्रमाणे आहे.

१) कोविड - १९ रुग्णालयांना नियमित भेटी देणे.

२) या रुग्णालयातील विलगीकरण कक्ष, आयसीयू, इतर कागदपत्र तपासणे.

३) सीसी टि व्ही फुटेज तपासणे

४) रुग्णालयांना अचानक भेटी देणे.
५) रुग्णालय भेटीचा अहवाल राज्यस्तरावर सादर करणे.
६) रुग्णालय आणि रुग्ण उपचार यंत्रणेत करावयाच्या सुधारणेबाबत रुग्णालयांना शिफारसी देणे आणि या शिफारशींची अंमलबजावणी होते आहे किंवा नाही याबाबत खातरजमा करणे.
याशिवाय दि.१३ मे, २०२० रोजीच्या परिपत्रकान्वये कोविड-१९ या महामारीच्या परिस्थितीमध्ये मृतदेह हाताळण्याबाबत सूचना निर्गमित केल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे जिल्हयातील खडकवासला प्रकल्पाच्या कालवा दुरूस्तीसाठीच्या अंदाजपत्रकांना मान्यता मिळण्याबाबत**

**(३५) १३०७४ (०९-०९-२०२०). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हातील खडकवासला प्रकल्पाचे नवीन कालव्याच्या वितरिका दुरुस्तीसाठी सुमारे २१ कोटी रुपये व जुना (बेबी) कालवा दुरूस्तीसाठी सुमारे ८० कोटी रुपयांची अंदाजपत्रके मान्यतेकरिता माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान सादर करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अंदाजपत्रकांना मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (२९-०१-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

नवीन मुठा उजवा कालव्याच्या वितरीका क्र. २२,२३,२५,२६,३२,३५ व भिगवण शाखा कालव्याच्या कि.मी. १ ते २०, २१ ते २८ व २९ ते ३५ च्या दुरुस्तीची एकुण ९ अंदाजपत्रके विस्तार व सुधारणा अंतर्गत (रक्कम रु. २१.३१ कोटी) महामंडळाचे दि. २५.०७.२०१९ चे पत्रान्वये प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत शासनास सादर करण्यात आली आहेत. त्यावर शासनाने दि. ०९.१२.२०१९ च्या पत्रान्वये घेतलेल्या शे-यांची पूर्तता क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.

जुना मुठा उजवा कालवा (बेबी कालवा) कि.मी. २९ ते १०९ मधील अस्तरीकरण कामाची (रक्कम रु. ८३.१०) कोटी कामाची अंदाजपत्रके प्रदेश कार्यालयास सादर करण्यात आली होती. त्यापैकी कि. मी. ३२ ते ४१ मधील अस्तरीकरण कामाच्या रु. २३.९९ कोटी रकमेस सिंचन पुनर्स्थापना निधी अंतर्गत तांत्रिक मान्यता प्रदान केली असून त्या कामाची निवीदा प्रक्रिया क्षेत्रीय स्तरावर हाती घेण्यात आली आहे.

(२) नवीन मुठा उजवा कालव्याच्या वितरीका क्र. २२,२३,२५,२६,३२,३५ व भिगवण शाखा कालव्याच्या कि.मी. १ ते २०, २१ ते २८ व २९ ते ३५ च्या दुरुस्तीची एकुण ९ अंदाजपत्रके विस्तार व सुधारणा अंतर्गत (रक्कम रु. २१.३१ कोटी) महामंडळाचे दि. २५.०७.२०१९ चे पत्रान्वये प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत शासनास सादर करण्यात आली आहेत. त्यावर शासनाने दि. ०९.१२.२०१९ च्या पत्रान्वये घेतलेल्या शे-यांची पूर्तता क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.

जुना मुठा उजवा कालवा (बेबी कालवा) कि.मी. ३२ ते ४१ मधील अस्तरीकरण कामाच्या रु. २३.९९ कोटी रकमेस सिंचन पुनर्स्थापना निधी अंतर्गत तांत्रिक मान्यता प्रदान केली असून त्या कामाची निवीदा प्रक्रिया क्षेत्रीय स्तरावर हाती घेण्यात आली आहे
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोरोना आजाराचे सदोष अहवाल देणाऱ्या खासगी प्रयोग शाळेवर कारवाई करणेबाबत**

**(३६) १३०९५ (१०-०९-२०२०). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्रात मुंबई सह खासगी प्रयोग शाळेने कोरोना आजाराच्या अनेक सदोष अहवाल दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच, ठाणे शहरातील एका खासगी प्रयोगशाळेने ४४ संशयितांच्या चाचण्या सदोष आल्याचे दिनांक १५ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, कोरोना चाचणीचे सदोष अहवाल देणाऱ्यावर खासगी प्रयोगशाळावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२५-०१-२०२१) :**(१) हे अंशत: खरे आहे.
या संदर्भात ठाणे आणि नवी मुंबई कार्यक्षेत्रातून प्रत्येकी एक तक्रार झालेली आहे.
(२) ठाण्यातील थायरोकेअर या खाजगी प्रयोगशाळेत दि.१५.०५.२०२० रोजी ३९ कोरोना संशयितांच्या चाचण्या करण्यात आल्या. यापैकी १२ रुग्णाचे अहवाल पॉझिटिव्ह आल्याचा निष्कर्ष या प्रयोगशाळेने काढला होता. मात्र या १२ पॉझिटिव्ह चाचण्यांची फेर तपासणी ठाणे महानगरपालिकेच्या सी.आर.वाडीया या लॅब मध्ये केली असता १२ पैकी ५ सॅम्पल फेरतपासणी मध्ये निगेटिव्ह आले होते
(३) ठाणे महानगरपालिकेने थायरोकेअर लॅब संदर्भातील तक्रारी संदर्भात चौकशी केली होती व चौकशी अंती या थायरोकेअर लॅब ला सॅम्पल घेण्यापासून मनाई करण्यात आली होती. तथापि, सदर लॅबने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र.W.P.ASDB-LD-VC-८८ of २०२० दाखल करुन महानगरपालिकेने थायरोकेअर लॅबचे म्हणणे ऐकून घ्यावे. असा आदेश पारित केला त्यानुसार सुनावणी अंती थायरोकेअर लॅबला "याचिकाकर्ता यांनी पुनश्च दि.२९.०६.२०२०पासून व्यवसाय करण्यास मुभा देण्यात येत आहे. परंतू व्यवसाय करताना भारत सरकार महाराष्ट्र शासन, आयसीएमआर आणि ठाणे महानगरपालिका यांनी वेळोवेळी दिलेले दिशा निर्देश, नियम, अटी व शर्ती यांचे काटेकोर पालन होवून व्यवसाय करण्यता यावा" अशी समज देवून सॅम्पल घेण्याची परवानगी देण्यात आली ठाणे महानगरपालिकेच्या सदर समज आदेशाविरुध्द मे. थायरोकेअर लॅबने पुन्हा याचिका क्र. W.P.ASDB-LD-VC-१९६ of २०२० मा.उच्च न्यायालयात दाखल केली असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर महानगर पालिकेच्या मंगळवारी झोन अंतर्गत नागरी वसाहतीमध्ये कोविड- १९ चे रुग्णालय सुरू करण्याबाबत

**(३७) १३२५६ (१०-०९-२०२०). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेच्या मंगळवारी झोन अंतर्गत केटी नगर, फ्रेंड्स कॉलनी जवळ, काटोल रोड येथे नागरी वसाहती मधील रिक्त शॉपिंग मॉल मध्ये कोविड- १९ चे लागण झालेल्या रुग्णांसाठी रुग्णालय सुरू करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रूग्णालय सुरु न करण्यासाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणात आंदोलने केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरिकांचा विरोध असतानाही नागरी वस्तीमध्ये कोविड- १९ चे रुग्णालय सुरू करण्याचे कारणे काय काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२५-०१-२०२१) :**(१) हे अंशत: खरे आहे,

मंगळवारी झोन अंतर्गत के.टी.नगर कोटोल रोड येथील वाणिज्यीक इमारतीमध्ये सार्वजनिक आरोग्य सेवेच्या दृष्टीने कोविड -१९ बाधित मध्यम स्वरुपाच्या रुग्णांच्या उपचाराकरिता कोविड आरोग्य केंद्र उभारणीचे काम हाती घेण्यात आले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) शासनाच्या त्रिस्तरीय योजने अंतर्गत मध्यम स्वरुपाची लक्षणे असलेल्या कोविड रुग्णांचे उपचाराकरिता उद्रेकजन्य परिस्थितीतील संभाव्य रुग्णसंख्या विचारात घेवून शहरातील सार्वजनिक आरोग्य सेवा सक्षम करणे हा हेतू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सातारा जिल्हयात कोरोनाग्रस्त रुग्णांवर उपचार करण्यासाठी अधिक प्रमाणात केअर युनिट सेंटर्स स्थापन करण्याबाबत .

**(३८) १३२९२ (१४-०९-२०२०). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना विषाणू संसर्गामूळे सातारा जिल्हयात कोरोना बाधितांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे माहे जून व जुलै, २०२० मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातारा जिल्हयात केवळ २० केअर युनिट सेंटर्स असल्याने कोरोनाग्रस्त रुग्णांवर उपचार करण्यात अडचणी निर्माण होत असल्याचे दिनांक ८ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हयातील केअर युनिट सेंटर्स जादा प्रमाणात निर्माण करावीत अशी मागणी कोरोनाग्रस्त व त्यांचे नातेवाईकांकडून सार्वजनिक आरोग्य मंत्री, जिल्हा पालक मंत्री, सातारा, प्रधान सचिव, मा. सार्वजनिक आरोग्य विभाग, सहसंचालक, आरोग्य सेवा,पुणे जिल्हा प्रशासन तसेच जिल्हा परिषद प्रशासनाकडे करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोरोनाग्रस्तांची वाढती संख्या लक्षात घेता सातारा जिल्हयात अधिक प्रमाणात केअर युनिट सेंटर्स स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्सास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२५-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) सातारा जिल्हयात कोरोनाग्रस्त रुग्णांवर उपचार करण्यासाठी ८ जून, २०२० रोजी २५ कोविड -१९ निगा केंद्र कार्यरत होती. त्यामुळे रुग्णांवर उपचार करताना अडचणी निर्माण झाल्या नाहीत.

(३) हे अंशत: खरे आहे.

वेळोवेळी रुग्णसंख्येचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार कोव्हीड निगा केंद्रांची संख्या वाढविण्यात आली आहे.

(४) सातारा जिल्हयात दि.२५ जुलै, २०२० रोजी ३१ कोविड निगा केंद्रे कार्यरत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवीन रुग्णालय सुरु करणे व कार्यान्वित रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्यासाठी जोडबृहत आराखडा तयार करण्याचे काम प्रलंबित असल्याबाबत.

**(३९) १३३२५ (१७-०७-२०२०). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित नवीन रुग्णालय सुरु करणे व कार्यान्वित रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्यासाठी जोडबृहत आराखडा तयार करण्याचे काम गत ५ वर्षापासून सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आराखडा तयार करण्याचे काम पूर्णत्वास जात नसल्याने रत्नागिरी जिल्हयातील मौजे वावे (ता. खेड) आणि मौजे आबलोली (ता. गुहागर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांचे ग्रामिण रूग्णालयात श्रेणीवर्धन होणे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्यासाठी जोडबृहत आराखडा तयार करण्यास विलंब होत असल्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार या कामास विलंब करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह प्राथमिक आरोग्य केंद्रांचे ग्रामिण रूग्णालयात श्रेणीवर्धन करण्यासाठी जोडबृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही पूर्ण होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२-०२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारीत जोड-बृहत आराखडा मंजूर करण्यापूर्वी, मंजूरी देण्यात आलेल्या रुग्णालयांपैकी काही रुग्णालयांच्या इमारतीची बांधकामे अद्याप सुरू आहेत.ही बाब विचारात घेता सुरू असलेल्या रुग्णालयांच्या इमारतीची बांधकामे पूर्ण करण्यास निधीच्या उपलब्धतेनुसार वेळ लागत असल्याने जोड-बृहत आराखडा अंतिम करण्याची कार्यवाही सुरू करण्यास विलंब लागत आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**कोरोना आजारावर प्रतिबंधात्मक लस उपलब्ध होण्याबाबत**

**(४०) १३४३७ (१४-०९-२०२०). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कोरोना बाधीत रुग्णांची संख्या कमी होण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(२) असल्यास, या आजारावर प्रतिबंधात्मक लस उपलब्ध झाली आहे काय,

(३) नसल्यास, या आजारावर किती दिवसात लस उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे?

**श्री. राजेश टोपे (२५-०१-२०२१) :** (१) राज्यातील कोरोना बाधीत रुग्णांची संख्या कमी व्हावी आणि उद्रेक नियंत्रणात यावा, यासाठी पुढील उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत.

१) फ्ल्यू सदृष्य रुग्णांचे सर्वेक्षण.

२) बाधीत रुग्णाच्या निकट सहवासितांचा शोध, निदान व विलगीकरण.

३) बाधीत रुग्णाच्या रहिवासी भागात कंटेनमेंट क्षेत्र घोषित करुन सर्वेक्षण व आवश्यकतेनुसार मानवी हालचालीवर निर्बंध.

४) कोविड निदानासाठी पुरेशा प्रयोगशाळा.

५) कोविड रुग्णावर उपचारासाठी त्रिस्तरीय रचनेमध्ये पुरेशी रुग्णालय, खाटा व गंभीर रुग्णांसाठी आवश्यक उपचार सुविधा.

६) जोखमीच्या भागातून आलेल्या व्यक्तींचे घरी/संस्थात्मक पातळीवर क्वॉरंटाईन.

७) कोविड रुग्णोपचार करणा-या डॉक्टर्स आणि आरोग्य कर्मचा-यांसाठी पुरेशी संरक्षक साधने.

८) औषध व साधन सामुग्रीचा पुरेसा साठा.

९) कोविड प्रतिबंध व नियंत्रणासाठी जनतेचे प्रबोधन.

(२) व (३) आय सी एम आर ने दिलेल्या माहिती नुसार सध्या भारतीय बनावटीच्या लसीचे मनुष्यावरील चाचणी अंतिम टप्प्यात आहे व तातडीच्या वापरासाठी लस कंपन्यांनी केंद्र शासनाकडे परवानगी मागितली आहे. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार लसीकरणासाठी पुर्व प्रक्रिया / तयारी सुरु झालेली आहे.

---

**राज्यात कोरोना विषाणूच्या संसर्गाच्या काळात खासगी दवाखान्यामध्ये व खासगी डॉक्टर रुग्णांवर उपचार करत नसल्याबाबत**

**(४१) १३५४१ (१४-०९-२०२०). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना विषाणूच्या संसर्गाच्या काळात खासगी दवाखान्यामध्ये व खासगी डॉक्टर रुग्णांवर उपचार करत नसल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,

(३) असल्यास, त्यानुसार कोराना संसर्गाच्या काळात रुग्णांवर उपचार न करण्या-या खासगी दवाखाने व खासगी डॉक्टरांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२५-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.

याबाबत तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) कोविड प्रतिबंध व नियंत्रणासाठी लागू करण्यात आलेल्या लॉक डाऊनच्या काळात सर्व खाजगी रुग्णालये व दवाखाने उघडे ठेवण्याबाबत सर्वांना सुचित करण्यात आले हाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्हयात आरोग्य उपकेंद्र व प्राथमिक आरोग्य केंद्र उभारणेबाबत.**

**(४२) १३६०० (१७-०७-२०२०). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर, आटपाडी व तासगाव (जि.सांगली) तालुक्यामध्ये आरोग्य उपकेंद्र उभारण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी सातत्याने मागणी करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सांगली जिल्हयातील पारे, आळसंद, माहुली (ता. खानापूर) शेटफळे, झरे (ता. आटपाडी) याठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.आरोग्य मंत्री यांच्याकडे दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहाराद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खानापूर, आटपाडी, तासगाव येथे आरोग्य उपकेंद्र उभारण्यास व पारे, आळसंद, माहुली (ता. खानापूर) शेटफळे, झरे (ता. आटपाडी) याठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सद्या कोरोना संसर्गाचा वाढता प्रादुर्भाव पाहता आरोग्य यंत्रणा बळकट करण्याच्या दृष्टीने उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२५-०१-२०२१) :** (१) व (२) होय,  हे खरे आहे.

(३) व (४)  खानापूर, आटपाटी व तासगांव या तालुक्यामध्ये सन २०११ च्या लोकसंख्येच्या आधारे,  जोडबृहत आराखडयात उपकेंद्रे प्रस्तावित करण्याची कार्यवाही जिल्हा परिषद सांगली यांच्या स्तरावर  सुरु आहे.

या विभागाच्या दि.०८.०३.२०१९ च्या शासन निर्णयान्वये अनुशेषांतर्गत असलेले विटा, ता. खानापूर, जि. सांगली येथील प्राथमिक आरोग्य केंद्र, मौजे आळसंद, ता. खानापूर येथे स्थलांतरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

बृहतआराखडयात मौजे पारे व मौजे झरे येथे प्राथमिक आरोग्य केंद्र प्रस्तावित करण्याची कार्यवाही जिल्हा परिषदेकडे सुरु आहे.

माहुली व शेटफळ येथे प्राथमिक आरोग्य केंद्र प्रस्तावित नाहीत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मारेगाव (जि. यवतमाळ) तालुक्यातील गोंडबुरांडा येथील जि. प. शाळेत क्वारंटाईन केलेल्या युवकाने पळून जाऊन झाडाला गळफास घेत आत्महत्या केल्याबाबत**

**(४३) १३८२६ (१५-०९-२०२०). श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोरगांव (जि. यवतमाळ) तालुक्यातील गोंडबुरांडा येथील जिल्हा परिषद शाळेत क्वारंटाईन केलेल्या अहमदनगरवरून परत आलेल्या युवकाने पळून जाऊन झाडाला गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना दिनांक १६ मे, २०२० रोजी च्या सकाळी निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासनाच्या दुर्लक्षितपणामुळे सदर युवक क्वारंटाईन केंद्रातून १२ मे रोजीपासून गायब झाला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासर्व प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२५-०१-२०२१) :** (१)  हे खरे आहे.

(२) सदर व्यक्ती दिनांक १४ मे २०२० ला सकाळी ११ ते १२ दरम्यान कोणलाही न सांगता निघून गेला.

(३) होय.

(४) रामू विठ्ठल अत्राम वय २२ हे अहमदनगर एम. आय. डी. सी. मधून दि.११.०५.२०२० रोजी मारेगांव कोरोना सेंटरला आले होते व त्यांना गृहविलगीकरण शिक्का मारण्यात आला होता. तसेच वैदयकीय प्रमाणपत्र देण्यात आले आणि त्याच दिवशी गौंड बुरांडा येथे गेले असता, ग्राम स्तरीय कोरोना दक्षता समितीने त्यांना १४ दिवसांसाठी जिल्हा परिषद शाळेमध्ये ठेवण्यात आले होते व त्याचे सोबत दोन सहप्रवासी ठेवण्यात आले हाते. दि.१४.०५.२०२० ला

आशा अंगणवाडी सेविका व आरोग्य सेविका सदर इसम विलगीकरण कक्षातून निघून गेल्याचे निदर्शनास आल्याने तात्काळ वैदयकीय अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी यांना दु. १.३० वा कळविले त्यानंतर लगेच तालुका आरोग्य अधिकारी व वैदयकीय अधिकारी यांनी जि.प.शाळा गौंड बुरांडा विलगीकरण कक्षाला भेट दिली असता, सदर व्यक्ती आढळून आला नाही. त्यानंतर सदर व्यक्तीबाबत घरच्या लोकांना विचारणा करण्यात आली असता. तो घरी आला नसल्याचे सांगितले तसेच तो कोठे गेला असेल याबद्दलची घरच्यांनाही माहिती नव्हती यानंतर तालुका आरोग्य अधिकारी यांनी पोलीस पाटील व गौंड बुरांडा येथील कोरोना दक्षता समिती यांना पोलीस तक्रार करण्याकरिता सुचना दिल्या व कोरोना दक्षता समितीने दि.१५.०५.२०२० रोजी पोलीस स्टेशन मारेगांवला तक्रार केली. सदर इसमाने शेतामध्ये गळफास लावून आत्महत्या केल्याची माहिती दि.१६ मे २०२० रोजी मिळाली.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आशा वर्कर व अंगणवाडी सेविका यांना ३ हजार रूपये गौरव धन देण्याबाबत.**

**(४४) १३८३८ (१०-०९-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आशा वर्कर व अंगणवाडी सेविका यांना ३ हजार रूपये गौरव धन देण्याबाबत विधानसभा सदस्य, बल्लारपूर यांनी सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना दिनांक ७ जून २०२० रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (०१-०२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) आशा स्वयंसेविकांना कोविड-१९ संबंधी कामकाजाकरीता एप्रिल, २०२० पासून दरमहा रु. १०००/- इतका मोबदला अदा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**पाथरी (ता. सावली) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात एमबीबीएस डॉक्टर उपलब्ध करण्याबाबत.**

**(४५) १३८४० (१०-०९-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी (ता. सावली) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात एमबीबीएस डॉक्टर तातडीने उपलब्ध करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,चंद्रपूर यांना दिनांक ९ जून २०२० रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२९-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी संवर्गाची २ पदे मंजुर असून सदर पदावर सद्यस्थितीत एमबीबीएस अर्हताधारक उपलब्ध न झाल्याने २ बीएएमएस अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी कंत्राटी तत्वावर कार्यरत असून त्यांचेमार्फत रुग्णांना सुविधा पुरविली जाते. तसेच वैद्यकीय अधिकारी, गट-अ संवर्गातील नियमित रिक्त पदे भरण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीस देण्यात आले असून त्यानुसार पदभरतीची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वरणगाव (ता.भुसावळ, जि.जळगाव) येथील पोलीस प्रशिक्षण केंद्र स्थलांतरित करण्याचा निर्णय रद्द करण्याबाबत**

**(४६) १३८६७ (१३-०९-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरणगाव (ता.भुसावळ, जि.जळगाव) येथे ऑर्डीनन्स फॅक्टरी लगतच्या जमिनीवर राज्य राखीव पोलीस बल गट प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी शासनाने सन १९९९ मध्ये मंजुरी दिली होती व सदर केंद्राचे भूमिपूजनही झाले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रशिक्षण केंद्र वरणगाव येथून कुसडगाव (जि. अहमदनगर) येथे स्थलांतरित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रशिक्षण केंद्र स्थलांतरित करण्यामागे कोणती कारणे आहेत तसेच सदर निर्णयामुळे जळगाव जिल्ह्यातील जनतेमध्ये असंतोष व अन्यायाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उत्तर महाराष्ट्रातील रहिवाशांसाठी सर्व दृष्टीने सोयीचे असलेले वरणगाव येथील पोलिस प्रशिक्षण केंद्र स्थलांतरित करण्याचा निर्णय रद्द करून पुन्हा सदर केंद्र वरणगाव येथे सुरू करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. अनिल देशमुख (२९-०१-२०२१) :** (१) गृह विभाग, शासन निर्णय दि.२६/१०/१९९४ अन्वये वरणगांव, जि.जळगांव येथे पोलीस प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यासाठी तत्वत: मान्यता देण्यात आली होती.
(२) व (३) राज्य राखीव पोलीस बलाची गरज असल्याने, गृह विभाग, शासन निर्णय दि.१३/०९/२०१९ अन्वये हातनुर-वरणगांव, ता.भुसावळ, जि.जळगांव येथील जागेत राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१९ निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली होती.

परंतु प्रशासकीय कारणास्तव गृह विभाग क्र. अेपीओ-३६१५/प्र.क्र.१२२/पोल-३,दि.१६/०६/२०२०अन्वये सदर गट क्र.१९ हातनुर-वरणगांव, ता.भुसावळ, जि.जळगांव ऐवजी कुसडगांव, ता. जामखेड, जि.अहमदनगर येथे स्थापन करण्यास मान्यता दिली आहे.

(४) राज्य राखीव पोलीस बलाचा एक नविन गट हातनुर-वरणगांव, ता.भुसावळ, जि. जळगांव येथे स्थापन करण्याबाबतचा पोलीस महासंचालक कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता वित्त विभागाने वित्त विभाग,शासन निर्णय दि.०४.०५.२०२० अन्वये पदनिर्मितीवर निर्बंध असल्याने सदर प्रस्ताव सुप्त प्रतिक्षाधीन ठेवण्याबाबत अभिप्राय दिले आहेत.

---

**बेंबळा प्रकल्प अंतर्गत पुनर्वसित गावांना सोयी सुविधा देणेबाबत**

**(४७) १४०७३ (१५-०९-२०२०). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील बेंबळा प्रकल्पांतर्गत धामणगाव रेल्वे मतदार संघामधील टिटवा, घुईखेड, येरड, धामक, बेलोरा, सावंगा, एक्लारा या गावांचे बारा ते तेरा वर्षापूर्वी पुनर्वसन होऊन सुध्दा अद्यापपर्यंत मुलभूत सोयी सुविधांची बरीच कामे अपूर्ण आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास बारा वर्ष पूर्ण होऊनसुध्दा अद्यापपावेतो पाणीपुरवठा, रस्ते व स्मशानभूमीची कामे अपूर्ण असल्यामुळे या गावातील नागरिकांना गैरसोयींचा सामना करावा लागत आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास त्यांना सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. जयंत पाटील (२८-०१-२०२१) :**(१) हे अंशत: खरे आहे.

बेंबळा प्रकल्पांतर्गत अमरावती जिल्हयातील बुडित क्षेत्रात येणाऱ्या मौजे टिटवा, घुईखेड, येरड, बेलोरा, सावंगा व एक्लारा या पुनर्वसीत गावठाणात मुलभुत नागरी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. सदर सुविधा हस्तांतरणाची कार्यवाही प्रगती पथावर आहे.

अंशत: बाधीत होणारे मौजे धामक हे गांव प्रकल्पांचे सुधारीत येवा अभ्यासानुसार पाणी पातळी कमी झाल्याने बुडीत क्षेत्राच्या बाहेर राहणार आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

उपरोक्त पुनर्वसीत गावात मुलभूत नागरी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. तथापी नागरीकांचे मागणीनुसार यापूर्वी पुरविण्यात आलेल्या नागरी सुविधांचे दर्जेदार पुनर्वसनांतर्गत आधुनिकीकरण आणि अंतर्गत पाणी पुरवठयाची कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अमरावती यांचे मार्फत, तसेच इमारत व बांधकाम दुरुस्तीची कामे विशेष प्रकल्प विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग अमरावती यांचे मार्फत ठेव तत्वावर प्रगतीपथावर आहेत

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जैतापूर (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रातील १८ गावांचा समावेश असलेल्या उपकेंद्रातील पदे रिक्त असलेबाबत**

**(४८) १४३१८ (१०-०९-२०२०). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जैतापूर (ता.राजापूर,जि.रत्नागिरी ) येथील आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रातील १८ गावांचा समावेश असलेल्या एका उपकेंद्रात आरोग्य सेवक व आरोग्य सेविका ही दोन्ही पदे रिक्त असलेबाबत माहे मे,२०२० मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, कोरोना या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव वाढल्याने व अन्य पदापैकी औषध निर्माता, आरोग्य सहायिका, पुरुष परिचर ही पदे रिक्त असल्यामुळे कार्यरत असलेल्या आरोग्य कर्मचा-यांवर कामाचा अतिरिक्त ताण पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बाब वारंवार निदर्शनास आणून देखिल शासन स्तरावर अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. हसन मुश्रीफ (०२-०२-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) नाही. रिक्त असलेल्या जागेवर जवळच्या उपकेंद्रातील कर्मचा-यांना अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे.

(३) व (४) जिल्हा परिषदेकडील आरोग्य विभागातील रिक्त पदे भरणेबाबत वित्त विभाग व सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेने कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा रूग्णालय, नाशिक येथे कोरोना रुग्णांना रेमडेसिव्हीर इंजेक्शन उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४९) १४६१६ (१५-०९-२०२०). ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा रूग्णालय, नाशिक येथे कोविड-१९ उपचार केंद्रावर कोरोना या आजारावर प्रभावी ठरणाऱ्या रेमडेसिव्हीर इंजेक्शनचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा निर्माण झाल्याने रुग्णांना रेमडेसिव्हीर इंजेक्शन वेळेत उपलब्ध न झाल्याने अनेक रुग्णांचा मृत्यू झाल्याचे दिनांक ९ ऑगस्ट २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेमडेसिव्हीर इंजेक्शन उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधीनी माहे जुलै, २०२० च्या अंतिम आठवड्यात करूनही त्याकडे दुर्लक्ष केल्याने अनेक रुग्णांचा मृत्यू झाला असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोराना रुग्णंना रेमडेसिव्हीर इंजेक्शन उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (०२-०२-२०२१)** :(१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे रेमडेसिव्हीर इंजेक्शन खरेदी करण्यासाठी शासनाकडून अनुदान उपलब्ध झाल्याने, रेमडेसिव्हीर इंजेक्शनचा साठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे.

तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान, डीपीडीसी यांचेकडून रेमडेसिव्हीर इंजेक्शन खरेदीसाठी निधी प्राप्त झाला व संचालक, आरोग्य सेवा यांचेकडून रेमडेसिव्हीर इंजेक्शन प्राप्त झालेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला जिल्हयातील नेरधामणा प्रकल्पाचे काम पुर्ण करणेबाबत**

**(५०) १८९३४ (२१-११-२०२०). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील नेरधामणा प्रकल्पाचे माहे जुन, २०२० अखेरपर्यंत ९० टक्के काम पुर्ण झाले असून मागील २ वर्षापासून प्रकल्पात १०० टक्के पाणीसाठा संचय केला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नेरधामणा प्रकल्पा अंतर्गत सिंचनासाठी बंदिस्त पाईपद्वारे पाणी पुरवठा करण्यात येणार असून सदर प्रकल्पाचे पंपगृह व बंदिस्त पाईप लाईनचे काम प्रलंबित असल्याने प्रकल्पातील पाणीसाठा दोन वर्षापासून विना वापर पडून आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर प्रकल्पाच्या पंपगृह व बंदिस्त पाईप लाईनचे प्रलंबित काम तात्काळ पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (२८-०१-२०२१) :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) पंपगृहाचे काम मऊ मातीवर असल्याने व सदर कामाच्या संकल्पनाचा अनुभव मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक यांना नसल्याने संकल्पनास विलंब होत आहे. ह्या संदर्भात.मुख्य अभियंता, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक व मुख्य अभियंता (वि.प्र.) जलसंपदा विभाग, अमरावती यांनी दि.६/१०/२०१७ रोजी प्रकल्पस्थळी संयुक्त भेट दिली. मा.मुख्यमंत्री यांनी अकोला जिल्हाच्या विविध समस्यांबाबत दि.१८/१२/२०१९ रोजीच्या बैठकीत संकल्पने तातडीने उपलब्ध करुन घेवुन प्रकल्पाचे काम मार्गी लावण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांनी दि.१८/०५/२०२० रोजी घेतलेल्या बैठकीत याबाबत आढावा घेतला. मुख्य अभियंता, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी दि.१२/८/२०२० रोजी दृकश्राव्य बैठकीत संकल्पनाबाबत आढावा घेतला. दि.१४/८/२०२० रोजी मा.सचिव यांनी घेतलेल्या बैठकीमध्ये संकल्पनाबाबत आढावा घेतला. तसेच मा.राज्यपाल महोदय यांचे प्रधान सचिव यांनी दि.१७/८/२०२० रोजी दृकश्राव्य बैठकीमध्ये याबाबत निर्देशित केले आहे.

(४) प्रश्न उद्दभवत नाही. पंपगृहाच्या मऊ भूस्तरावरील पायव्याचे संकल्पन चाकोरीबाह्य प्रकारचे असल्यामुळे पंपगृह व नलिका वितरण प्रणाली ची कामे पूर्ण करण्यास्तव मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक व क्षेत्रिय यंत्रणेस शासन स्तरावरुन आवश्यक निर्देश देण्यात आलेले आहेत

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.